www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक **लोकरक्षणाय**

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ३९ ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, शनिवार १५ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन २७ जूनपासून मुंबईत

● मुंबई, भावना जैन :

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन मुंबई येथे गुरुवार, २७ जून ते शुक्रवार, १२ जुलै २०२४ या कालावधीत होणार आहे. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येणार आहे.

विधानभवन मुंबई येथे विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. यावेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

पान २ वर

### जोपर्यंत रोहिंग्या बांग्लादेशींना परत पाठवणार नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही - मंगल प्रभात लोढा

● मुंबई, विशाल पाटील :



मुंबईतील वाढत्या रोहिंग्या आणि बांग्लादेशी लोकांच्या अनधिकृत वास्तव्यामुळे फक्त पोलिसांची नाही, तर आपल्या समाजाची देखील डोकेदुखी वाढली आहे. वाढती गुन्हेगारी, आमलीपदार्थांचा व्यापार इतकच नाही तर त्यांनी या वेळी मतदान देखील केले. माझी निवडणूक आयोगाला विनंती आहे कि, त्यांनी महाराष्ट्रातील मतदार यादीची पुन्हा तपासणी करावी आणि त्यामधील रोहिंग्या किंवा बांग्लादेशी नागरिकांची नावे काढून टाकावी.

पान २ वर

# लोकसभा निवडणूक होऊनही पालिकेचे ८००० कर्मचारी कामावर रूजू नाहीत




● मुंबई, विशाल कारंडे :

महापालिकेचे आठ हजार कर्मचारी अजूनही निवडणूक ड्युटीवर असल्याने पालिकेच्या पावसाळापूर्व कामांचा प्रचंड खोळंबा होत असल्याचं समोर आलंय. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या (BMC) अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामातून मुक्त करण्यासाठी मुंबई महापालिका आयुक्तांनी मुंबई आणि मुंबई उपनगरच्या दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे. जर कार्यमुक्त करूनसुद्धा 13 जूनपासून मुंबई महापालिका कर्मचारी अधिकारी कामावर न आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार असल्याचं महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

पान २ वर

### आयुक्तांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 साठी राज्यभरातील विविध ठिकाणाहून विविध विभागातून कर्मचारी, अधिकारी निवडणुकीच्या कामासाठी लावण्यात आले. मात्र आता निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर सुद्धा अनेक अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामातून कार्यमुक्त न केल्याने मुंबई महापालिकेच्या पावसाळापूर्व कामे खोळंबल्याचं चित्र आहे. यामुळे मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी मुंबईतील दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून या अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात यावे अशा प्रकारची विनंती केली आहे.

# अतिधोकादायक इमारतींचा पाणी, वीज पुरवठा खंडीत करा; ठाणे महापालिका आयुक्तांचे आदेश

● ठाणे, यश सावंत :



शहरातील अतिधोकादायक इमारतींचा वीज, पाणी पुरवठा खंडीत करण्याबरोबरच मलनि:सारण वाहिन्या तत्काळ तोडून टाकण्याचे आदेश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. इमारत अतिधोकादायक असल्याचे पालिका प्रशासनाने घोषित केल्यानंतरही अशा इमारतींमध्ये नागरिक वास्तव्य करीत असून पावसाळ्यात इमारती कोसळून दुर्घटना होऊ नये म्हणून आयुक्तांनी हा निर्णय घेतला आहे. याशिवाय, स्थिरता प्रमाणपत्र नसलेली तसेच जास्तीचे आकारमान असलेली जाहिरात फलक तत्काळ उतरवा आणि रस्त्यावरील खड्डे भरणे, झाडाच्या फांद्या उचलणे ही कामे २४ तासांत व्हायला पाहिजेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

मान्सूनसाठी तयारीच्या दृष्टीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जिल्ह्याच्या पालकसचिव सुजाता सौनिक यांनी दिलेले निर्देश, तसेच लोकप्रतिनिधी, नागरिकांनी केलेल्या तक्रारी या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व उपनगर अभियंता, सर्व सहाय्यक आयुक्त, आरोग्य अधिकारी, वृक्ष अधिकारी, सर्व कार्यकारी अभियंता यांची शुक्रवारी बैठक घेतली. महापालिका क्षेत्रात एकूण ९६ अतिधोकादायक इमारती (सी -१ वर्गवारी) आहेत.

पान २ वर

# उत्पादन शुल्क विभागाच्या अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारणीला गती द्यावी -उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई



● मुंबई, दिगंबर जाधव :

उत्पादन शुल्क विभागासाठी स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र मंजूर करण्यात आले आहे. या केंद्रासाठी वाटोळे, (ता. पाटण, जि. सातारा) येथील जागा निश्चित करण्यात आली आहे. केंद्र उभारण्यासाठी जमीन ताब्यात घेवून प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करण्यात यावी. उत्पादन शुल्क विभागाचे पहिले प्रशिक्षण केंद्र उभारण्याच्या कार्यवाहीला गती देण्यात यावी, असे निर्देश उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी दिले तसेच प्रशिक्षण केंद्र अंतर्गत प्राधान्याने पुरूष व स्त्री वसतिगृह, ग्रंथालय व मुख्य इमारत प्रधान्याने पूर्ण करण्याच्या सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

मंत्रालयात प्रशिक्षण केंद्राबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीला उत्पादन शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, आयुक्त विजय सुर्यवंशी, संचालक प्रसार सुर्वे, कोल्हापूर विभागाचे उपायुक्त श्री. चिंचाळकर, उपसचिव रविंद्र औटी, अवर सचिव संदीप ढाकणे आदी उपस्थित होते.

वाटोळे येथील जागा ताब्यात घेवून बांधकामासाठी आवश्यक परवानग्या काढण्याची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना देत उत्पादन शुल्क मंत्री श्री. देसाई म्हणाले की, जिल्हा प्रशासनाने जमिनीचा ताबा उत्पादन शुल्क विभागाला द्यावा. या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थींची निवास व्यवस्था, संगणक प्रयोगशाळा, ग्रंथालय, व्यायामशाळा तसेच हेलिपॅड आदी सुविधांचा समावेश असणार आहे. प्रशिक्षण केंद्रामध्ये प्राधान्यक्रमानुसार बांधकामे करण्यात यावी. क्रीडा विषयक सुविधांचीही उभारणी करण्यात यावी. यावेळी उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना उत्कृष्ट, गुणवत्तापूर्ण कार्याबद्दल पदक व सन्मानचिन्ह प्रदान करण्याच्या योजनेचाही आढावा घेण्यात आला. पदक निवडीबाबत अटी, निवड समित्या, पदकांचे प्रकार आदींबाबत याप्रसंगी चर्चा करण्यात आली.

# शालेय विद्यार्थ्यांना लवकरच दर्जेदार एकसमान गणवेश देणार

### शालेय शिक्षण विभागाचे स्पष्टीकरण




● मुंबई, नितीन देवळेकर :

'एक राज्य एक गणवेश' योजनेची अंमलबजावणी सन 2024-2025 या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येत आहे. त्याअंतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून यापैकी एक गणवेश नियमित स्वरूपाचा तर दुसरा गणवेश स्काऊट व गाईड या विषयाकरिता निर्धारित करण्यात आलेला आहे. याकरिता प्रती गणवेश 300 रुपये आर्थिक तरतूद उपलब्ध असून त्यातील 190 रुपये कापड खरेदीकरिता तर 110 रुपये शिलाई, अनुषंगिक खरेदी व वाहतुकीकरिता निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार महिला आर्थिक विकास महामंडळाकडून गणवेशाच्या शिलाईचे काम जोमाने सुरू असून विद्यार्थ्यांना लवकरात लवकर गणवेश उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील 44 लाख 60 हजार 004 विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

समग्र शिक्षा अभियान या कार्यक्रमांतर्गत मागील काही वर्षांपासून राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये गणवेशाचे कापड व शिलाई करून विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून देण्यात येत होते. या प्रक्रियेमध्ये गणवेशाच्या रंगसंगतीमध्ये एकसमानता नसून शालेय समिती व मुख्याध्यापकांना कापडाच्या दर्जाबाबत परिपूर्ण माहिती नसल्याने बऱ्याच वेळा कमी दर्जाचे कापड प्राप्त होणे आदी त्रुटी जाणवून आल्या आहेत. या बाबींचा विचार करून एक राज्य एक गणवेश योजना राबविण्यात येत आहे. याबाबतचा शासन निर्णय 8 जून 2023 रोजी निर्गमित करण्यात आला असून 10 जून 2024 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे स्काऊट व गाईड गणवेशाबाबत अधिक स्पष्टता करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे हा शासन निर्णय निर्गमित करण्यास काही कालावधी लागला असला तरी याबाबतचे नियोजन यापूर्वीच करण्यात आले असल्याचेही विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

पान २ वर





● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे - ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक ५ चे रुंदीकरण करण्यासाठी ६३ तासांचा मेगा ब्लॉक घेण्यात आला.त्यानंतर रुंद फलाटावर छत तोकडे पडल्याने वर बांबु आणि ताडपत्रीचे तात्पुरते आच्छादन लावण्यात आली. तरीही ऊन, वारा, पावसात प्रवाश्यांची मात्र गैरसोय सुरूच असल्याचे दिसुन येत आहे.

# राम मंदिर बॉम्बने उडवण्याची दहशतवाद्यांची धमकी, अयोध्या अलर्ट मोडवर

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

अयोध्येतील राम मंदिर दहशतवादी संघटनेच्या निशाण्यावर असल्याची मोठी बातमी समोर आली आहे. दहशतवाद्यांनी राम मंदिर उडवण्याची धमकी दिल्याने एकच खळबळ माजली आहे. दहशतवाद्यांच्या धमकीमुळे अयोध्या प्रशासन अलर्ट मोडवर आहे. जैश-ए-मोहम्मद दहशतवादी संघटनेने अयोध्येतील राम मंदिर उडवण्याची धमकी दिली आहे. या धमकीच्या पार्श्वभूमीवर राम मंदिर आणि विमानतळाच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

राम मंदिर उडवण्याची दहशतवादी संघटनेची धमकी

जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने राम मंदिर उडवण्याची धमकी दिल्यानंतर अयोध्या अलर्ट मोडवर आलं आहे. राम मंदिरासह महत्त्वाच्या ठिकाणच्या सुरकेतषा वाढव करण्यात आली आहे. महर्षी वाल्मिकी विमानतळाचीही सुरक्षा वाढवण्यात आली, एसएसपी राज करण नय्यर यांनी महर्षी वाल्मिकी विमानतळावर पोहोचून सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. त्यांनी



अयोध्या राम मंदिरातील सुरक्षेचाही आढावा घेतला. दहशतवादी संघटनेने दिलेल्या धमकीवर त्यांनी काहीही बोलण्यास नकार दिला.

राम मंदिरासह अयोध्येत सुरक्षा बंदोबस्तात वाढ

दरम्यान, अयोध्येच्या सुरक्षेबाबत एसएसपी राज करण नय्यर म्हणाले की, अयोध्या धामची सुरक्षा व्यवस्था वेगवेगळ्या भागात विभागली गेली आहे आणि सुरक्षेसाठी पथके तयार केली जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली चोख सुरक्षा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे, विविध झोनमध्ये सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

जिल्हा पोलिसांव्यतिरिक्त पीएसीच्या अनेक कंपन्याही आल्या आहेत, पीएसी तैनात करून सुरक्षा व्यवस्था केली जात आहे. संरक्षित, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे संपूर्ण परिसरावर पोलिस नजर ठेवून आहेत, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली आहे.

राम मंदिर दहशतवाद्यांच्या निशाण्यावर

जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने राम मंदिर उडवून देण्याची धमकी दिली आहे. यासंदर्भात धमकी देणारा ऑडिओ क्लिपही व्हायरल करण्यात आली आहे. व्हायरल झालेल्या ऑडिओमध्ये आमिर नावाच्या जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्याने मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी देत म्हटलं आहे की, आमची मशीद हटवून मंदिर बांधलं आहे. आता याला बॉम्बने उडवणार. आमच्या तीन साथीदारांनी बलिदान दिलं असून आता हे मंदिर पाडावंच लागेल, असं व्हायरल क्लिपमधील व्यक्ती बोलत आहे. ही क्लिप सध्या व्हायरल होत आहे. दरम्यान, या क्लिपचं समर्थन एबीपी माझा करत नाही.

# पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना आवश्यक सुविधा द्याव्यात -उपमुख्यमंत्री अजित पवार

● पुणे, अभिजित येरल्लू :

आषाढी पालखी सोहळ्यादरम्यान पंढरपूर, पालखी मार्ग, पालखी तळ आदी ठिकाणी पाणी, वीज, आरोग्य आणि स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. सोहळ्यासाठी शासनातर्फे आवश्यक निधी देण्यात येईल, असेही सांगितले.

विधान भवन पुणे येथे झालेल्या श्री क्षेत्र देहू व श्री क्षेत्र आळंदी पालखी सोहळा-२०२४ पूर्वतयारी




आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस आमदार सर्वश्री दिलीप मोहिते पाटील, संजय जगताप, दत्तात्रय भरणे, समाधान अवताडे, बबन शिंदे, संजय शिंदे, सुनील कांबळे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल, पुणे आणि सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की, पालखी सोहळ्यासाठी फिरते शौचालय आणि टँकरची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी. शौचालयाच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष द्यावे.

इंद्रायणी नदी स्वच्छतेचे काम तातडीने करण्यात यावे. पालखी सोहळा झाल्यानंतर पंढरपूर शहरात स्वच्छतेसाठी आवश्यक नियोजन करण्यात यावे. मानाच्या पालख्यांसह इतर पालख्यांसाठी रात्रीच्या वेळी विद्युत व्यवस्था करण्यात यावी. पालखी मार्गाला लागून असलेल्या जागा सोहळ्याच्यादृष्टीने कायमस्वरूपी ताब्यात घेऊन त्याचा पालखी सोहळा वगळता इतर वेळी अन्य उपयोग करण्याबाबत प्रस्ताव तयार करावा. अशा जागांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. पालखी मार्गावरील कायमस्वरुपी सुविधेच्यादृष्टीने विभागीय आयुक्तांकडे बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. पालखी सोहळा चांगल्यारितीने संपन्न व्हावा यासाठी शासन- प्रशासनातर्फे आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल. शासनाचे सर्व विभाग सकारात्मक राहून सोहळा यशस्वी करण्यासाठी काम करतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पान २ वर

# उजनी पर्यटन विकास केंद्र उभारण्याच्या पुन्हा हालचाली, पुण्यात अजित पवारांच्या उपस्थितीत बैठकीत आराखडा सादर



● सोलापूर, सचिन कदम :

सोलापूर आणि पुणे जिल्ह्याच्या सीमेवर उजनी धरणाच्या पायथ्याला पर्यटन केंद्र उभारण्यासह सोलापूर जिल्ह्यात एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उजनी पर्यटन विकास आराखडा सादर केला. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव दाखल केल्यास सुरुवातीला शंभर कोटींचा निधी राज्य विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात उपलब्ध करून देण्याची ग्वाही पवार यांनी या बैठकीत दिली.

पुण्यात विधान भवनात झालेल्या बैठकीत सोलापूर जिल्ह्यातील एकात्मिक पर्यटन विकासावर चर्चा झाली. उजनी पर्यटन केंद्र उभारणीसाठी तत्कालीन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी पुढाकार घेऊन चालना दिली होती. महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाने उजनी धरणालगतची सहा हेक्टर जमीन जलसंपदा विभागाकडे मागितली होती. मात्र जमिनीच्या मोबदल्याचा मुद्दा प्रलंबित आहे.

पान २ वर

## संपादकीय

# आणखी एका प्रादेशिक पक्षाला ठेच

ओडिशा विधानसभेची निवडणूक जिंकून भाजपने ईशान्येपाठोपाठ पूर्वेकडील राज्यांमध्ये आपले बस्तान बसविण्यास सुरुवात केली आहे. १४७ सदस्यीय विधानसभेत ७८ जागा, तर लोकसभेच्या २१ पैकी २० जागा जिंकून भाजपने या राज्यात निर्भेळ यश संपादन केले. शेजारील पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी भाजपला रोखले असताना गेली २४ वर्षे मुख्यमंत्री असलेल्या नवीन पटनायक यांना पराभवाला सामोरे जावे लागले. राष्ट्रीय मुद्द्यांवर भर दिल्याचे नेहमीच सांगणाऱ्या भाजपने यंदा ओडिशामध्ये उडिया अस्मितेवर प्रचारात विशेष भर दिला. तसेच पटनायक यांच्या सरकारच्या विरोधातील नाराजीचा फायदा भाजपने बरोबर उचलला. डेहराडूनमधील गर्भश्रीमंतांच्या डून स्कूलनंतर विदेशात शिक्षण घेतलेल्या नवीन पटनायक यांचा मूळ पिंड राजकारणाचा नव्हताच. मातृभाषा उडियासुद्धा त्यांना नीट बोलता / वाचता येत नसे. पण वडील बिजू पटनायक यांच्या निधनानंतर त्यांचे राजकीय उत्तराधिकारी म्हणून सूत्रे हाती घेऊन नवीन पटनायक यांनी १९९७ मध्ये जनता दलात सुरू असलेल्या वादानंतर बिजू जनता दलाची वेगळी चूलही मांडली. अटलबिहारी वाजपेयी सरकारमध्ये मंत्रीपद आणि २००० पासून मुख्यमंत्री असा नवीन

पटनायक यांचा राजकीय प्रवास झाला. स्वच्छ प्रतिमा, पारदर्शक कारभार यांमुळे भाषा येत नसली तरी जनतेने नवीनबाबूंचे नेतृत्व स्वीकारले. लागोपाठ पाच विधानसभा निवडणुकांमध्ये एकहाती सत्ता मिळविण्याचा विक्रम त्यांनी केला. कुपोषणबळींनी गाजलेला कालहंडीसारखा जिल्हा त्यांनी सुधारला, तर ओडिशाला हॉकीची राजधानी केले. अलीकडे ७७ वर्षीय नवीन पटनायक यांना प्रकृति अस्वास्थ्यामुळे हिंडण्याफिरण्यावर मर्यादा आल्या होत्या. त्यांचे सचिव व सनदी अधिकारी व्ही. के. पंडियन हे प्रशासन आणि राजकारण अशा दुहेरी वर्तुळात महत्त्वाची भूमिका बजावीत होते. स्वेच्छानिवृत्ती स्वीकारून पंडियन यांनी बिजू जनता दलात प्रवेश केला आणि ते पक्षाची रणनीती ठरवू लागले. अविवाहित पटनायक यांचे पंडियन हे राजकीय उत्तराधिकारी असेच चित्र उभे राहिले. पंडियन हे मूळचे तामिळी. यामुळे ओडिशाची सूत्रे तामिळीच्या हातात देणार का, असा मोदींपासून भाजपच्या नेत्यांनी प्रचारात भर दिला. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात पंडियन हाच विषय एवढा तापला की ते आपले राजकीय उत्तराधिकारी

नसल्याचा खुलासा करण्याची वेळ पटनायक यांच्यावर आली. पण तोवर बराच उशीर झाला होता.

वास्तविक या निवडणुकीपूर्वी ओडिशात बिजू जनता दल आणि भाजपची युती होणार हे जवळपास निश्चित झाले होते. पण तब्बल १७ दिवसांच्या वाटाघाटीनंतर जागावाटपाची चर्चा फिसकटली आणि भाजपने स्वबळावर लढण्याचे जाहीर केले. याआधीही पंजाब, आसाम, गोवा, महाराष्ट्रासह अन्य काही राज्यांमध्ये भाजपने प्रादेशिक पक्षांचे बोट धरून आपली ताकद वाढविली आणि नंतर त्याच प्रादेशिक पक्षांना फेकून दिले. तोच प्रकार ओडिशामध्येही आता घडला आहे. १९९७ ते २००८ या काळात बिजू जनता दल आणि भाजप हे मित्रपक्ष होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या पटनायक सरकारमध्ये भाजपच्या वतीने मंत्री होत्या. मागास भागात धर्मांतराचे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची ओरड सुरू झाली, तिला शह देण्यासाठी बजरंग दल सक्रिय झाले होते. याच दरम्यान ऑस्ट्रेलियन धर्मप्रचारक ग्रॅहम स्टेन्स व त्यांच्या दोन लहान मुलांची जानेवारी १९९९ मध्ये जिवंत जाळून निर्घृण हत्या करण्यात आली, तेव्हापासून बजरंग दल, संघ परिवार आणि भाजपने हळूहळू या राज्यात हातपाय पसरण्यास सुरुवात केली. मग २००८ मध्ये कंधमहल जिल्ह्यात हिंदू-ख्रिश्चन असा हिंसक संघर्ष झाला होता व त्यात ३० पेक्षा अधिक लोक मारले गेले, तर हजारो विस्थापित झाले. यानंतर नवीन यांनी भाजपची साथ सोडली; तरीही संसदेत वा बाहेरही त्यांनी कायम भाजपला अनुकूल अशीच भूमिका घेतली होती.



## आजची चित्रोळी

वसंतात मुंडावळ्या बांधून
आतुरतेनें सजला !
नवरदेव भेटीस सखीच्या
मोहरूनियां गेला !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन २७...

या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे) यांच्यासह कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

पावसाळी अधिवेशन २७ जून ते शुक्रवार, १२ जुलै २०२४ या कालावधीत होणार असून, एकूण तेरा दिवस कामकाज चालणार आहे. शनिवार २९ जून २०२४ सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहील, असे या बैठकीत ठरविण्यात आले.

### जोपर्यंत रोहिंग्या बांग्लादेशींना परत...

ATS अतिशय चांगल्या रीतीने त्यांची धरपकड करत आहे आणि त्यांना परत पाठवत आहे. आम्ही मुंबई उपनगरात यासाठी एक विशेष टीम सुद्धा गठीत केलेली आहे. जोपर्यंत रोहिंग्या बांग्लादेशींना परत पाठवणार नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. असे मत मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केले आहे.

अनधिकृतरित्या कागदपत्रे बनवून भारतीय नागरिकांच्या हक्काच्या सुविधा घुसखोरांना मिळत असल्याने आज कठोर कायद्याची गरज आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे गृहमंत्री या बाबतीत सजग असून, त्यावर योग्य कार्यवाही होईल असे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना सांगितले. भारतीय जनता पार्टीद्वारे वसंत स्मृती येथे आयोजित केलेल्या प्रादेशिक बैठकीनंतर मंत्री लोढा बोलत होते.

### लोकसभा निवडणूक होऊनही पालिकेचे...

कामावर हजर न झाल्यास कारवाई होणार

मुंबई महापालिकेतील साधारणपणे 10,400 कर्मचारी अधिकारी निवडणुकीच्या कामासाठी महापालिकेकडून पाठवण्यात आले होते. त्यातील 8000 कर्मचारी अजूनही मुंबई महापालिकेच्या विविध विभागात कार्यरत झालेले नाहीत. 6 जून रोजी यासंबंधी पत्र महापालिका आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले होते.

निवडणुकीनंतरसुद्धा अधिकारी, कर्मचारी हे कार्यमुक्त करण्यात आलेले नाही. त्यामुळे अजून एक स्मरणपत्र जिल्हाधिकाऱ्यांना महापालिकेकडून पाठवण्यात आले. त्यामुळे 13 जूनपासून संबंधित महापालिका अधिकारी, कर्मचारी निवडणूक कार्यातून मुक्त होऊन महापालिकेच्या कामावर रुजू न झाल्यास त्याचे वेतन रोखण्यात येईल, शिवाय त्याच्यावर कारवाई केली जाईल अशा स्पष्ट सूचना महापालिकेकडून देण्यात आले आहे.

शिक्षक-पदवीधर निवडणुकीसाठी काही कर्मचाऱ्यांची गरज

आता यावर आम्ही मुंबईतील जिल्हाधिकाऱ्यांचे म्हणणं जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मुंबई महापालिकेतील काही कर्मचारी, अधिकारी हे 26 जून रोजी मुंबईत होणाऱ्या मुंबई शिक्षक आणि मुंबई पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या कार्यासाठी आवश्यक असून काही कर्मचारी, अधिकाऱ्यांना आम्ही कार्यमुक्त करू शकलो नसल्याचं सांगितलं आहे. तर इतर सर्व अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिला असल्याचं मुंबई उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी एबीपी माझा शी बोलताना सांगितलं.

मुंबईत पावसाळ्याला सुरुवात झालेली असताना निवडणुकीच्या कार्यासाठी काही कर्मचारी, अधिकारी सोडून इतर कर्मचारी अधिकाऱ्यांना कार्यमुक्त केलेलं असताना अजूनही 8000 कर्मचारी जर कामावर रुजू होत नसतील तर नक्कीच महापालिकेच्या कामात अडथळा उद्भवू शकतो. त्यामुळेच प्रशासनाने कार्यमुक्त करूनसुद्धा जे कर्मचारी, अधिकारी पालिकेच्या कामावरून रुजू होत नाहीत अशा कर्मचारी, अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची तयारी सुरू झाली आहे.

### अतिधोकादायक इमारतींचा पाणी, वीज...

त्यापैकी, ३७ इमारतीत नागरिक राहत आहेत. त्यात, नौपाडा आणि कोपरी २७, माजिवडा १, उथळसर ३, कळवा २, मुंब्रा ४ अशा इमारतींचा समावेश आहे. या सर्व इमारतींचा पाणी, वीज खंडीत करण्याबरोबरच मलनि:सारण जोडणी तोडून या इमारती रिकाम्या करून घ्याव्यात, असे आदेश आयुक्त राव यांनी दिले.

नागरिकांच्या जिविताचा प्रश्न असल्याने आता चर्चा करण्यात वेळ दवडू नये. नागरिकांची समजूत काढून त्यांना सुरक्षित स्थळी जाण्यास सांगणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. पावसाचा जोर कधीही वाढू शकतो, याची जाणीव सगळ्यांनी ठेवावी, असेही आयुक्त राव म्हणाले. पुढील दोन दिवसात सहाय्यक आयुक्तांनी त्यांच्या विभागातील अतिधोकादायक (सी -१) आणि धोकादायक (सी २ ए) अशा सर्व इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करावी आणि रहिवाशांना तेथून स्थलांतरित होण्यासाठी संवाद साधावा, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना हलविण्याची वेळ आली तर आपल्या संक्रमण शिबिरामध्ये पाणी, वीज आणि स्वच्छता राखली जाईल, हे पाहावे. नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. पाणी साठणाऱ्या सखल भागातील १४ मोक्याच्या ठिकाणी ६३ पंप आणि इतर व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासोबतच, स्थानिक तरुणांना स्वयंसेवक म्हणून सोबत घ्यावे. त्यांना ओळखपत्र, जॅकेट देण्यात यावे. त्यांच्या मदतीमुळे आपत्कालीन स्थितीत नागरिकांपर्यंत जाणे शक्य होईल, असेही त्यांनी सांगितले.

खाडीच्या मुखापाशी कचरा साठून ते पाणी नाल्यात पाठीमागे येत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे सर्व ठिकाणी खाडी मुखांपाशी नाल्यांची स्थिती कशी आहे ते पाहून तेथे स्वच्छता करण्यात यावी. गटारांची झाकणे वरचेवर पाहणी करून सुस्थिती राहतील, याची खबरदारी घ्यावी. तसेच, रस्त्यावर साचणारे पाणी पर्जन्यजलवाहिन्यांमध्ये व्यवस्थित वाहून जाईल, तेथे कचरा, माती साचणार नाही, याचीही काळजी घ्यावी, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. नाल्यातील तरंगता कचरा दररोज साफ केला जावा. त्याचप्रमाणे, किती ठिकाणी सफाई झाली याचा दैनंदिन अहवाल सादर करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले आहेत.

पावसाळ्यात मोठी दुरुस्ती नको

नागरिकांनी पावसाळ्यात घरामध्ये कोणतीही मोठ्या स्वरुपाची दुरुस्ती करू नये. सोसायट्यांनी अशा दुरुस्तीसाठी परवानगी देवू नये. त्याचबरोबर, व्हायब्रेटर सारख्या उपकरणाचा वापर निरीक्षकांच्या देखरेखीत करावा. काही इमारतींच्या दुरुस्तीच्या कामात नियमांची पायमल्ली केली जात असल्याने दुर्घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याची नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

### शालेय विद्यार्थ्यांना लवकरच दर्जेदार...

शासन स्तरावरून 'एक राज्य एक गणवेश' या धोरणाची अंमलबजावणी करताना केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयांतर्गत येणाऱ्या टेक्सटाईल कमिटी या प्रतिष्ठित संस्थेची मदत घेण्यात आली असून या संस्थेशी सखोल चर्चा करून उच्च दर्जाच्या गणवेशासाठी कापडाचे तांत्रिक निकष निश्चित करण्यात आले आहेत. गणवेश शिलाईचे काम स्थानिक महिला बचत गटामार्फत करण्यात येत असल्याने या महिलांना रोजगार उपलब्ध होत असून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यास मदत होत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाद्वारे या कामाचे संपूर्ण नियोजन करण्यात येत आहे. महामंडळाद्वारे राज्यातील प्रत्येक तालुक्यात शिलाई केंद्र स्थापन करण्यात आले असून त्याद्वारे शिलाईचा दर्जा उत्तम राखण्याच्या दृष्टीने बचत गटाच्या महिलांना प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना गणवेश तातडीने उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने स्काऊट व गाईड या गणवेशाचे कापड शाळा व्यवस्थापन समितीस सुपूर्द करण्यात येत असून शालेय व्यवस्थापन समित्यांनाही शिलाई व अनुषंगिक वाहतूक खर्चासाठी प्रती गणवेश 110 रुपये अदा करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे इयत्ता सहावी ते आठवीमधील सर्व मुलींना सलवार, कमीज व दुपट्टा या स्वरूपात गणवेश पुरवठा करण्यात येत आहे. तर उर्दू माध्यमाच्या शाळांमधील मुलींना इयत्ता पहिली पासूनच सलवार, कमीज व दुपट्टा देण्यात येत असल्याची बाब विचारात घेऊन उर्दू माध्यमाच्या शाळांमधील मुलींनाही सलवार, कमीज व दुपट्टा या स्वरूपात गणवेशाचा पुरवठा करण्यात येत आहे.

गणवेशाच्या कापडाचा दर्जा उत्तम राहण्याच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्यात येत असून विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचा गणवेश उपलब्ध होणार आहे. या गणवेशाबरोबरच स्काऊट व गाईड विषयाशी सुसंगत स्कार्फ, स्काऊट बेरेट कॅप व वॉगल, तसेच भारत स्काऊट गाईड राष्ट्रीय कार्यालय, नवी दिल्ली यांचे साहित्य देखील शाळा स्तरापर्यंतच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याचबरोबर राज्य शासनाद्वारे विद्यार्थी व विद्यार्थीनींना एक जोडी बूट व दोन जोडी पायमोजेही पुरविण्यात येणार असून याबाबतचा निधी देखील शाळा व्यवस्थापन समितीला प्रदान करण्यात आला आहे. शालेय गणवेशाचा पुरवठा विद्यार्थ्यांना लवकरात लवकर व्हावा, या उद्देशाने शासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असल्याचे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

### पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना आवश्यक...

अन्य जिल्ह्यातून येणाऱ्या पालखी सोहळयासाठी सुरक्षा आणि अन्य व्यवस्था देण्याबाबत राज्य स्तरावरून सूचना देण्यात येतील. वारी दरम्यान सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात येईल मात्र दुर्घटना घडल्यास शासनातर्फे आर्थिक सहकार्य करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. यावर्षी फिरते शौचालय आणि स्वच्छतेसाठी मनुष्यबळ अधिक संख्येने ठेवण्यात आले आहे. रस्त्याची सुरू असलेली कामे पालखी सोहळयापूर्वी पूर्ण करण्यात येणार आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे आषाढी वारीसाठी ॲप आणि प्रशासनातर्फे संपर्क पुस्तिका तयार करण्यात येईल. स्वच्छ आणि निर्मल वारीसाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सुरक्षा आणि वाहतूक नियोजनाबाबत माहिती दिली.

### उजनी पर्यटन विकास केंद्र उभारण्याच्या...

उजनी धरणाच्या परिसरात कृष्णा खोरे विकास महामंडळाची जमीन आहे.

धरणाची उभारणी होऊन ४२ वर्षांचा कालावधी लोटला आहे. धरणाच्या मूळ आराखड्यात धरणाच्या पायथ्यास उजव्या तीरावर ४३.२६ हेक्टर जमीन पैठणचे संत ज्ञानेश्वर उद्यान आणि म्हैसूरच्या वृंदावन उद्यानाच्या धर्तीवर उद्यान विकसित करण्यासाठी आरक्षित आहे. परंतु या जागेवरही मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. अतिक्रमणे केलेल्या स्थानिकांकडून या उजनी पर्यटन केंद्राच्या उभारणीला विरोध आहे. या पार्श्वभूमीवर अतिक्रमणमुक्त सहा हेक्टर जमीन एमटीडीसीने यापूर्वीच मागितली आहे.

उजनी धरणाकडे स्थलांतरित पक्ष्यांचे नंदनवन म्हणून पाहिले जाते. धरणावर दरवर्षी युरोपसह अन्य देशांतून पक्षी येतात. हिवाळयात रशियाजवळच्या युरेशिया, सायबेरिया, मंगोलिया आदी देशांतून पट्टकदंब हंस, चक्रवाक बदक, पाणटिवळे, धोबी यांसह अनेक पक्षी हिमालयाची हिमशिखरे ओलांडून भारतीय उपखंडात येऊन दाखल होत असतात. फ्लेमिंगो पक्ष्याचे विशेष आकर्षण असते. पुढे तीन-चार महिने विविध राज्यांतील जलस्थानांवर वास्तव्य करून पुन्हा आपल्या मूळ प्रदेशांकडे हे पक्षी निघून जातात. उजनी जलाशयावर विविध २२० प्रजातींचे पक्षी येतात. त्यामुळे पक्षी निरीक्षणासाठी अभ्यासकांसह पक्षी व निसर्गप्रेमींची गर्दी होते. तसेच उन्हाळयात धरणातील पाणीसाठा खालावतो, तेव्हा उघड्यावर पडणारे प्राचीन पळसदेव मंदिर, कुगाव येथील आदिलशाहीकालीन ऐतिहासिक इनामदारांची गढी पाहण्यासाठी पर्यटकांची वर्दळ वाढते. त्यामुळे उजनी धरणाच्या पायथ्याला पर्यटन केंद्र उभारल्यास मोठ्या प्रमाणावरआर्थिक चालना मिळू शकते.

या पार्श्वभूमीवर उजनी पर्यटन केंद्राचा प्रस्ताव पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पुन्हा ऐरणीवर आला आहे. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सादर केलेल्या उजनी पर्यटन विकास आराखड्यामध्ये उजनी बॅकवॉटर क्षेत्रात जल क्रीडा केंद्र उभारण्याचा मुद्दा समाविष्ट आहे. या बैठकीस करमाळयाचे आमदार संजय शिंदे व पंढरपूरचे आमदार समाधान अवताडे यांच्यासह जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# भय, भूक आणि भ्रष्टाचार मुक्त भारत व्हावा



अपेक्षेप्रमाणे सलग तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान झाले. ९ जूनच्या सायंकाळी राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात नव्या सरकारचा दिमाखदार शपथविधी सोहळा पार पडला. सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणारे मोदी हे पंडित नेहरू यांच्या नंतरचे दुसरेच पंतप्रधान आहेत. मोदींना स्वबळावर बहुमत मिळाले नसले तरी मित्र पक्षांच्या मदतीने त्यांनी सरकार स्थापन केले आहे. मोदी यांना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यात तरुणांचा मोठा वाटा आहे. मागील दोन निवडणुकीप्रमाणेच या निवडणुकीतही तरुणांनी एनडीएला भरभरून मतदान केले. आता या नव्या एनडीए सरकारने तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करावी. कारण गेल्या काही वर्षात देशातील बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. मागील काही वर्षात बेरोजगारीचा दर कमालीचा वाढला आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही तरुणांच्या हाती काम नाही अशी अवस्था झाली आहे. तरुणांच्या हाती पदवी आहे मात्र नोकरी नाही त्यामुळे तरुणांमध्ये कमालीचे नैराश्य पसरले आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत तोच तरुण वर्ग रोजगार नसल्याने नैराश्याच्या गर्तेत अडकला तर ती देशासाठी धोक्याची घंटा असेल. या तरुणांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी एनडीए सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. नवीन रोजगार निर्माण करण्यासाठी एनडीए सरकारने लवकरात लवकर उपाययोजना करायला हव्यात. संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार जगातील सर्वाधिक तरुण भारतात राहत आहे. देशातील ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० वयोगटातील आहे म्हणूनच भारताला तरुणांचा देश असे म्हंटले जाते. या तरुणांमध्ये प्रचंड गुणवत्ता असून काम करण्याची ऊर्मी आहे. या तरुण वर्गाला जर रोजगार मिळाला तर त्यांच्या गुणवत्तेचा आणि मेहनतीचा उपयोग राष्ट्र उभारणीच्या कार्यात नक्कीच होईल. तरुणांप्रमाणेच शेतकऱ्यांचे प्रश्न देखील मोठ्या प्रमाणात आहेत. दुष्काळाने बळीराजा होरपळून निघाला आहे. पाऊस नाही त्यामुळे पीक नाही जे पीक आहे त्याला भाव नाही अशी अवस्था देशातील बळीराजाची झाली आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्येचे सत्र अजूनही सुरू आहे. एनडीए सरकारने पिकांना हमीभाव देऊन स्वामिनाथन आयोगाची प्रभावी अंमलबजावणी करावी. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना अनुदान देऊन त्यांना दिलासा द्यावा. मोदी सरकारच्या मागील पाच वर्षाच्या काळात शेतकऱ्यांना अनेकदा मोर्चा काढावा लागला. महाराष्ट्रासह काही राज्यातील शेतकऱ्यांवर संपावर जाण्याची वेळ आली तशी वेळ पुन्हा येता कामा नये याची दक्षता सरकारने घ्यायला हवी. देशातील महागाई वाढत चालली आहे. महागाईने सर्वसामान्यांची कंबर मोडली आहे. वाढत्या महागाईने मध्यमवर्ग चिंताग्रस्त झाला आहे. घरगुती गॅस सिलेंडर आणि इंधनाचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. दिवसेंदिवस महागाई गगनाला भिडत आहे. गगनाला भिडणारी ही महागाई रोखण्याचे काम एनडीए सरकारने करावे. देशातील नागरिकांचा सर्वात जास्त खर्च आरोग्य आणि शिक्षणावर होत आहे. या सरकारने नागरिकांचा शिक्षण आणि आरोग्यावरील खर्च कमी करावा. २००५ नंतर सरकारी सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. मोदी सरकारच्या पहिल्या पाच वर्षाच्या काळात भ्रष्टाचाराला आळा बसला होता मात्र मागील पाच वर्षात देशात पुन्हा भ्रष्टाचार वाढला आहे त्यामुळे आता पुन्हा एकदा भ्रष्टाचारावर सर्जीकल स्ट्राईक करण्याची वेळ आली आहे. नव्या सरकारने तो करावा अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. मागील पाच वर्षात सरकारी यंत्रणांचा मोठा दुरुपयोग करण्यात आला आता तरी सरकारने सरकारी यंत्रणांचा दुरुपयोग थांबवावा. नवीन सरकारने दलीत, आदिवासी, अल्पसंख्यांक समाजाला सुरक्षित वाटेल अशी वातावरण निर्मिती करावी. मागील काही वर्षापासून देशात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात तर सातत्याने दुष्काळ पडत आहे. नदीजोड प्रकल्प हाच या दुष्काळावर उपाय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या तिसऱ्या कार्यकाळात तरी नदीजोड प्रकल्प कसोशीने राबवायला हवा. जर हा प्रकल्प राबवला तर देशातील कोट्यवधी नागरिकांची तहान भागेल तसेच अनेक राज्यांचा पाणीप्रश्न सुटेल. या सरकारने संविधानाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. राष्ट्रीय सुरक्षेसोबतच देशांतर्गत सुरक्षेबाबतही सरकारने ठोस पावले उचलायला हवीत. नव्या सरकारच्या शपथविधीच्या दिवशीच जम्मू काश्मीरमध्ये वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. या हल्ल्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले. याचाच अर्थ असा की देशात अजूनही दहशतवादी कारवाया सुरूच आहेत. देशातून अजूनही दहशतवाद हद्दपार झाला नाही. जी गोष्ट दहशतवादाची, तीच गोष्ट नक्षलवादाची. नक्षलवादी अधून मधून डोके वर काढतच असतात. देशात आजही नक्षलवादी कारवाया सुरू आहेत. या सरकारने दहशतवाद, नक्षलवाद मोडून काढायला हवा. एकूणच भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त भारत हीच नव्या सरकारकडून जनतेची अपेक्षा आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# कल्याणमधील दुर्गाडी किल्ल्याचा बुरूज ढासळला

● कल्याण – ऐतिहासिक कल्याण शहराचे सांस्कृतिक वैभव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहराच्या प्रवेशव्दारावरील दुर्गाडी किल्ल्याच्या बुरूज गुरूवारी रात्री ढासळला. रात्रीच्या वेळेत हा प्रकार घडला. कोणीतीही हानी यात झाली नाही. गुरुवारी पडलेल्या पावसाच्या माऱ्याने बुरूजाचा काही भाग खचून हा बुरूज ढासळला असल्याची प्राथमिक माहिती आहे.

दुर्गाडी किल्ल्याच्या प्रवेशव्दारावरील डाव्या बाजुला हा बुरूज आहे. शुक्रवारी पहाटे नागरिक दुर्गाडी किल्ल्यावर येऊ लागले. त्यावेळी त्यांना बुरूजाचा दर्शनी भाग कोसळला असल्याचे समजले. ही माहिती तात्काळ कल्याण, डोंबिवली शहरात वाऱ्यासारखी पसरली. दुर्गाडी किल्ला हा कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत येत असला तरी त्यावर नियंत्रण पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहे.

पाच वर्षापूर्वी दुर्गाडी किल्ल्याचे दोन बुरूज ढासळले होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने या बुरूजांची डागडुजी करून ते सुस्थितीत केले होते. बुरूजावरील नवीन कामाला भेगा पडल्या आहेत. आता या नादुरुस्त भागाची देखभाल केली नाहीतर पावसाळ्यात या भागाला धोका निर्माण होऊ शकतो, अशी माहिती इतिहासप्रेमींनी व्यक्त केली. दुर्गाडी किल्ला हा निव्वळ दगडावर उभा नसून या किल्ल्याचा काही भाग मातीचा आहे. त्यामुळे पावसाळ्यात माती खचू लागली की असे प्रकार होऊ शकतात, असे एका जाणकाराने सांगितले. दुर्गाडी किल्ल्याच्या दोन्ही बाजुने २४ तास जड, अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. त्याचे दणके अप्रत्यक्षपणे किल्ल्याला बसत असतात.



त्याचाही हा परिणाम असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. दुर्गाडी किल्ला सुस्थितीत आणि देखणा असावा म्हणून शिवसेनेचे कल्याण पश्चिम शहरप्रमुख रवी पाटील यांच्या मागणीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुर्गाडी किल्ला नुतनीकरण कामासाठी २५ कोटीचा निधी गेल्या वर्षी मंजूर केला आहे. या निधीतील साडे सात कोटीचा निधी शासनाने प्रत्यक्ष कामासाठी मंजूर केला आहे. परंतु, या निधीतून वर्ष उलटले तरी दुर्गाडी किल्ल्याच्या संवर्धनाचे काम सुरू करण्यात आले नाही, असे दुर्गप्रेमींनी सांगितले.

■ शिवाजी महाराजांनी पहिल्या आरामाराची स्थापना कल्याणमध्ये केल्याचे इतिहासकार सांगतात. या आरामाराच्या किनारी दुर्गाडी किल्ल्याची उभारणी करण्यात आली. हे ऐतिहासिक वैभव टिकून ठेवण्यासाठी शासनाने दुर्गाडी किल्ल्याच्या नुतनीकरण, संवर्धनाचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी ठाकरे गटाचे शहरप्रमुख सचीन बासरे यांनी केली. दुर्गाडी किल्ल्यावर दुर्गादेवी मंदिर, मुस्लिम धर्मियांचे प्रार्थना स्थळ, सभोवताली बुरूज आहेत.

■ कल्याण डोंबिवली पालिकेने स्मार्ट सिटी प्रकल्पातून दुर्गाडी किल्ल्याच्या बाजुला खाडी किनारी नौदल आरमार उभारणीचे काम सुरू केले आहे. हा प्रेक्षणिय आणि प्रदर्शनीय प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर दुर्गाडी किल्ल्यावर येणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक प्रमाणात वाढणार आहे.

■ माजी नगराध्यक्ष ना. का. आहेर यांच्या कार्यकाळात दुर्गाडी किल्ल्याची डागडुजी करण्यात आली होती. बुरूज सुस्थिती करण्यात आले होते. आता बराच काळ लोटला असल्याने दुर्गाडी किल्ल्याच्या संपूर्ण तटबंदीची आहे ते अस्तित्व कायम ठेऊन नव्याने बांधणी होणे आवश्यक आहे. अन्यथा असे पडझडीचे प्रकार सुरूच राहतील.

**– श्रीनिवास साठे, कल्याणच्या इतिहासाचे अभ्यासक.**

## घोडबंदर उड्डाणपुलांच्या दुरस्ती कामांना दोन दिवसांत सुरुवात

### रात्रीच्या वेळेत कामे करण्यात येणार, तरी कोंडी ची शक्यता

● ठाणे : वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या घोडबंदर रस्त्यावरील पातलीपाडा आणि मानपाडा या दोन उड्डाणपुलांच्या दुरुस्तीची कामे येत्या दोन दिवसांत हाती घेतली जाणार आहेत. ही कामे रात्रीच्या वेळेत केली जाणार असून टप्प्याटप्प्याने ही कामे केली जाणार आहेत. ऐन पावसाळ्यात ही कामे हाती घेण्यात आल्याने घोडबंदर मार्गावर कोंडी होण्याची भिती व्यक्त होत आहे. रस्ते दुरुस्तीची कामे प्रशासनाला उन्हाळ्यात का सूचली नाहीत असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

घोडबंदर भागात गेल्या काही वर्षांपासून मोठ्याप्रमाणात लोकवस्ती वाढली आहे. कासारवडवलीपर्यंत सिमीत असणाऱ्या उंच इमारती आता गायमुखच्या टोकापर्यंत उभ्या रहत आहेत. घोडबंदर मार्गावर उरण येथील जेएनपीटीच्या बंदर आणि गुजरातच्या दिशेने वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांचा भारही वाढला आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी या मार्गावर मानपाडा, पातलीपाडा आणि वाघबीळ असे तीन उड्डाणपूल बांधण्यात आले आहेत. असे असले तरी मेट्रोची कामे, रस्त्यांची बिकट अवस्था, सेवा रस्त्यांचे खोदकाम यामुळे घोडबंदर मार्गावर वाहतूक कोंडी वाढली असून नागरिक हवालदील झाले आहेत. तसेच येथे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.


काही दिवसांपूर्वीच येथील गायमुख घाट रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले होते. या कामांमुळे कासारवडवलीपर्यंत वाहतूक कोंडी होत होती. तर, बोरीवली, मिरा भाईंदर आणि वसईच्या दिशेने



प्रवास करणारे वाहन चालक हैराण झाले होते. अवघ्या २० मिनिटांच्या अंतरासाठी वाहन चालकांना दोन ते अडीच तास लागत होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर येथील मानपाडा आणि पातलीपाडा या उड्डाणपुलांच्या दुरुस्तीचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. यातील पातलीपाडा या उड्डाणपुलाची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसांत पातलीपाडा मार्गाच्या दुरुस्तीला सुरुवात होणार असून याबाबत वाहतूक पोलिसांनी त्यास हिरवा कंदील दाखविला आहे. या उड्डाणपुलाच्या कामासाठी किमान दोन आठवडे लागणार आहेत. पातलीपाडा उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर मानपाडा या उड्डाणपुलाचे काम हाती घेतले जाणार आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी दिली.

येत्या एक ते दोन दिवसांत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उड्डाणपुलांच्या दुरुस्तीची कामे सुरू होण्याची शक्यता आहे. परंतु ही कामे रात्रीच्या वेळेत सुरू ठेवावी अशी सूचना करण्यात आली आहे. त्यामुळे सकाळच्या वेळेत उड्डाणपुलावरील वाहतूक सुरू राहील.

## हिरव्या शालूने नटलेल्या माळशेज घाटावर दरड कोसळण्याचे संकट कधी दुर होणार!



मुरबाड - मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात तसेच शहरी भागात कुठेही दरड कोसळण्याची ठिकाणे व टेकड्या आढळून येत नाही अशी माहिती मुरबाड तालुका तहसील कार्यालय प्रशासनाने दिली आहे परंतु मुरबाड -कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या माळशेज घाटावर प्रत्येक वर्ष दरड कोसळण्याचे संकट आजही कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग मुरबाड उपविभागाने माळशेज घाटात दरड कोसळणे यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविल्याची माहिती मिळाली आहे. कोकण आणि अहमदनगर यांना जोडणारा एक प्राचीन घाट म्हणून ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटाचा उल्लेख होतो. पेशवे कालखंडात या घाटातून सैनिक वसईच्या मोहिमेसाठी गेल्याची नोंद सापडते. सह्याद्रीच्या कड्या कपारीतून अजय आजही हा घाट पुणे, अहमदनगर, औरंगाबाद ,नांदेड ,या भागात ठाणे जिल्ह्यातून पोचवतो. ऐतिहासिक कालखंडात या घाटाला विशेष महत्त्व आहे परंतु आज नियोजना अभावी हा घाट दुर्लक्षित राहिला आहे पर्यटकांच्या दृष्टीने निसर्ग सौंदर्याचे लेणं म्हणून हा घाट प्रसिद्ध आहे. हिरव्या शालू नेसून नटलेला डोंगरदऱ्या उंच ,कणखर डोंगरकडे धुक्याने पांघरलेला साज कडे कपारीतून बेधुंद धावणारे शुभ्र धबधबे रंगाचे धबधबे या सर्व वरदानामुळे माळशेज ही पर्यटकांची पंढरी मानली जाते .

एकाच वेळी येथे हजारो पर्यटक येत असतात घाटवाटे थांबून त्यात भिजण्याचा आनंद पर्यटक आवडीने घेत असत सदैव पर्यटकांनी फुलणाऱ्या माळशेज घाटाला दरडी कोसळण्याचे ग्रहण लागले असून.

## कल्याण-डोंबिवलीत प्लास्टर ऑफ पॅरिसच्या 'गणेश मूर्ती' विक्रीवर बंदी

● कल्याण : कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत यंदाही प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेश मूर्ती उत्पादन, विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशाने घेतला आहे. मूर्तिकारांनी पर्यावरणपूरक गणेश मूर्ती उत्पादनावर भर द्यावा आणि भाविकांनी अशा मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

पालिका हद्दीत गणेश मूर्तींचे उत्पादन, विक्री करण्यासाठी मूर्तिकार, कारागिर, विक्रेत्यांनी पालिकेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. जे मूर्तिकार, विक्रेते, कारागिर पालिकेकडे नोंदणी करणार नाहीत, त्यांना पालिका हद्दीत मूर्ती विकण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही, असे कल्याण डोंबिवली पालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सांगितले.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे २०२० च्या सुधारित नवीन मार्गदर्शक कायद्याने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती उत्पादनांवर बंदी घातली आहे. त्याचे काटेकोर पालन कल्याण डोंबिवली पालिकेकडून केले जाणार आहे. मूर्तिकार, उत्पादक, कारागिर, विक्रेते यांना मूर्ती तयार करण्याचा कारखाना सुरू करणे, मूर्ती विक्रीसाठी मंच लावणे यासाठी परवानगी देण्यासाठी पालिका प्रभाग कार्यालयांमध्ये नियोजन केले जाणार आहे. जे अशाप्रकारची परवानगी घेणार नाहीत, त्यांच्यावर पालिकेचे आरोग्य विभागाचे कर्मचारी कारवाई करतील, असे आयुक्त डॉ. जाखड यांनी स्पष्ट केले आहे.

पालिका परवानगीची प्रत प्रत्येक मूर्तिकार, कलाकार, विक्रेत्यांनी कारखाना, दुकानाच्या दर्शनी भागात लावावी.



### मूर्तिकार बैठक

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती उत्पादनावर भर देण्यात यावा. तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) वापरावर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची असलेली बंदी, तसेच पीओपीच्या वापराचे दुष्परिणाम याविषयावर मूर्तिकार, कारखानदार, विक्रेते यांच्याशी चर्चा करण्यासाठी कल्याण डोंबिवली पालिकेने शुक्रवार, १४ जून रोजी,दुपारी चार वाजता अत्रे रंगमंदिरातील सभागृहात एका बैठकीचे आयोजन केले आहे.

## अंबरनाथच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी निविदा, ४३० खाटांच्या रुग्णालयाचीही उभारणी होणार

● अंबरनाथः राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पाच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या बांधकामासाठी राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने निविदा जाहीर केल्या आहेत. यात अंबरनाथच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचाही समावेश आहे. एकूण ४०३ कोटींच्या खर्चातून महाविद्यालय आणि रुग्णालयाची वास्तू उभी केली जाणार असून अंबरनाथ वैद्यकीय शिक्षणाच्या परिघावर नवे केंद्र म्हणून उदयास येणार आहे.



अंबरनाथ शहरातील कै. बी. जी. छाया रुग्णालय एकेकाळी अंबरनाथसह आसपासच्या ग्रामीण भागातील रुग्णांसाठी मोठा आधार होते. मधल्या काळात राज्य शासन, स्थानिक अंबरनाथ नगरपालिका प्रशासन यांच्याकडे झालेल्या हस्तांतरणाच्या प्रक्रियेत रुग्णालयाच्या सक्षमीकरणाकडे दुर्लक्ष झाले होते. सध्या या रुग्णालयात विविध सुविधा देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र त्याचवेळी अंबरनाथसारख्या शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय असावे अशी अनेक वर्षांची मागणी होती. स्थानिक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार डॉ. बालाजी किणीकर हे दोघेही वैद्यकीय क्षेत्राची पार्श्वभूमी असलेले असल्याने त्यांच्याकडून याबाबत पाठपुराव्याची आशा होती. या दोघांच्या पाठपुराव्यामुळे अंबरनाथच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला मंजुरी मिळवण्यात यश आले होते. त्यानंतर अंबरनाथ पूर्वेतील शेतकी सोसायटीच्या भूखंडावर या महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या उभारणीसाठी जागेचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले. सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आता या महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या प्रत्यक्ष बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यासाठी राज्याच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाने ४०३ कोटी ८९ लाख रुपयांची मर्यादित स्वरुपाची निविदा जाहीर केली आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर 'सुपरमॅक्स' कामगारांचा ठिय्या ; एकनाथ शिंदे यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

● ठाणे : गेल्या दोन वर्षांपासून वेतन मिळत नसल्यामुळे संतप्त झालेल्या सुपरमॅक्स कंपनीच्या कामगारांनी गुरुवारी मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातील निवासस्थानाबाहेर ठिय्या मांडत आंदोलन केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलनकर्त्या कामगारांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि या समस्या लवकरच सोडवू असे आश्वासन दिले. यानंतर कामगारांनी आंदोलन मागे घेतले.

ठाणे येथील तीन हात नाका परिसरात ६० ते ७० वर्षांपासून सुपरमॅक्स कंपनी आहे. या कंपनीत दाढी करण्यासाठी लागणारे ब्लेड तयार करण्यात येते. या कंपनीत सुमारे दीड हजारांच्या आसपास कामगार कार्यरत आहेत. २०२२ साली



कंपनी व्यवस्थापनाने कंपनी चालवू शकत नसल्याचे कारण पुढे करत अचानकपणे कंपनी बंद केली.

यासंदर्भात, व्यवस्थापकाकडून कोणतीही अधिकृतरीत्या सूचना देण्यात आली नसल्याचा आरोप कामगारांकडून करण्यात आला आहे. कंपनी बंद झाली असली तरी, तुम्हाला वेतन दिले जाईल असे आश्वासन कंपनी व्यवस्थापकांकडून कामगारांना देण्यात आले होते.

परंतु, कामगारांना वेतन मिळत नसल्यामुळे त्यांनी गुरुवारी मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातील निवासस्थानाबाहेर ठिय्या मांडत आंदोलन केले.

### कुटुंबावर उपासमारीची वेळ

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलनकर्त्या कामगारांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर या समस्या लवकरच सोडवू असे आश्वासन त्यांनी दिले आणि यानंतर कामगारांनी आंदोलन मागे घेतले. गेल्या दोन वर्षांपासून वेतन मिळत नसल्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आल्याचे कामगारांकडून सांगण्यात आले. अनेक कामगार हे कर्जबाजारी झाले आहेत.

## राष्ट्र व कार्यापेक्षा जात व धर्म फॅक्टर प्रभावी ठरल्याचे देशाच्या भवितव्यासाठी घातक



● मुरबाड - लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्र व कार्यपेक्षा जात व धर्म हा फॅक्टर प्रभावी ठरला, हे देशाच्या भविष्यासाठी घातक आहे, असे मत माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी काल येथे व्यक्त केले. भिवंडी व शहापूरपाठोपाठ कपिल पाटील यांनी मुरबाड तालुक्यातील शिवळे येथील सुभाष पवार यांच्या व्हाईट हाऊस भाजपासह महायुतीचे कार्यकर्ते व नागरिकांबरोबर गुरुवारी संवाद साधला. या वेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष मधुकर मोहपे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख सुभाष पवार, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य उल्हास बांगर, ज्येष्ठ नेते रामभाऊ दळवी, शहापूर विधानसभा प्रमुख अशोक इरनक, भास्कर जाधव , मुरबाड पंचायत समिती माजी सदस्य अनिल देसले,आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. लोकसभेच्या निवडणुकीत काही जणांनी जातीच्या नावावर, तर आपण राष्ट्राच्या नावाने मते मागितली. आपण मोदीजींचे कार्य पाहून मतदानाचे आवाहन केले, तर त्यांनी धर्माच्या नावाने मतांची मागणी केली. आपले राष्ट्र व कार्यही चालले नाही. देश व कार्यापेक्षा जात व धर्म हा फॅक्टर चालला, तो देशाच्या भविष्याच्या दृष्टीने घातक आहे, असे मत कपिल पाटील यांनी व्यक्त केले. देशभरात तीन प्रमुख फॅक्टर चालविले गेले. त्यात भाजपाला ४०० हून अधिक जागा मिळाल्यावर, मुस्लिमांना भारत सोडून जावे लागेल, अशी भीती दाखविली गेली.

## केडीएमसी आणि पर्यावरण दक्षता मंडळ आयोजित निसर्गोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद


● कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि पर्यावरण दक्षता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद बालभवन, डोंबिवली येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त "निसर्गोत्सव 2024" या कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. डोंबिवलीतील पर्यावरण दक्षता मंडळ या संस्थेच्या ग्रीन लवर्स क्लबच्या सभासदांच्या आणि स्वयंसेवकांच्या कुंडीतील झाडांचे प्रदर्शन, पर्यावरणपूरक उत्पादनाचे स्टॉल, बागकाम कार्यशाळा, ट्रे लँडस्केप स्पर्धा, तसेच सापांविषयी जनजागृती सत्र असा भरगच्च कार्यक्रम दोन्ही दिवस आयोजित करण्यात आला.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या हस्ते "निसर्गोत्सव 2024" चे उद्घाटन व बाग प्रेमींचा कौतुक समारंभ पार पडला. पर्यावरण दक्षता मंडळाच्या 27 बागप्रेमींच्या 210 झाडांची कल्पक मांडणी करून प्रदर्शन भरवण्यात आले होते. "निसर्गोत्सव 2024" च्या पहिल्या दिवसाच्या पहिल्या सत्रात दुपारी ट्रे



लँडस्केप स्पर्धा घेण्यात आली ज्यात कल्याण व डोंबिवलीतील 10 बागप्रेमींनी आपल्या कल्पकतेने सुंदर व वेगवेगळ्या संकल्पनेवर आधारित ट्रे लँडस्केप तयार केले. सायंकाळी दुसऱ्या सत्रात कुंडीतील फुलझाडे या विषयावर सौ. मीनल मांजरेकर यांनी कार्यशाळा घेतली.

"निसर्गोत्सव 2024" च्या दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात दुपारी सेवा संस्था डोंबिवली च्या कार्यकर्त्यांनी सापांविषयी माहिती आणि प्रथमोपचार यावर मार्गदर्शन सत्र घेतले. दुसऱ्या सत्रात डॉ. श्रेया भानप यांनी "वृक्षारोपण: कला आणि शास्त्र" या विषयावर कार्यशाळा घेतली. त्यानंतर सायंकाळी महेश देशपांडे यांच्या हस्ते ट्रे लँडस्केप स्पर्धेच्या



विजेत्यांचे बक्षीस देऊन सत्कार करण्यात आले व ग्रीन लवर्सचे सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. निसर्गोत्सव 2024 च्या समारोपाच्या वेळी आर के बझार तर्फे सर्व सहभागींना 'निर्मल्यप्रभा' हे निर्माल्य खत मोफत उपलब्ध करून देण्यात आले. "निसर्गोत्सव 2024" च्या दोन्ही दिवस कुंडीतील झाडांचे प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते बालभवन येथे झाडांचे प्रदर्शन, बागकाम कार्यशाळा, स्पर्धा आणि जनजागृती उपक्रमासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिके कडून आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. कार्यक्रमाच्या पूर्वतयारी पासून ते समारोपापर्यंत सर्व उत्साही ग्रीन मेंबर्स यात सहभागी होते. डॉ. अंजली रत्नाकर, मिनल मांजरेकर आणि डॉ. श्रेया भानप यांच्या मार्गदर्शनामुळे स्पर्धा आणि कार्यशाळांचे आयोजन उत्तम रीतीने झाले. पर्यावरण दक्षता मंडळाचे समन्वयक रूपाली शाईवाले, आदित्य कदम आणि समीक्षा चव्हाण यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन केले.

# “फोटोत दिसताय त्याप्रमाणे सदैव...”, राज ठाकरेंच्या वाढदिवशी प्राजक्ता माळीची खास पोस्ट



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आज त्यांचा ५६ वा वाढदिवस साजरा करत आहेत. वाढदिवसानिमित्त राज्यभरातून मनसेचे लाखो कार्यकर्ते त्यांना शुभेच्छा देत आहेत. याशिवाय सोशल मीडियाच्या माध्यमातून राज ठाकरेंवर आज शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे. मराठी मनोरंजन विश्वातील अनेक कार्यक्रमांना राज ठाकरे आवर्जुन उपस्थित राहतात. याशिवाय मराठी चित्रपटांना चित्रपटगृहात हक्काचा शो टाइम आणि स्क्रिन्स मिळाव्यात यासाठी मनसेने अनेकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. यामुळेच त्यांचे अनेक मराठी कलाकारांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत.

राज ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त आज प्राजक्ता माळीने खास पोस्ट शेअर करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. प्राजक्ताने राज ठाकरे यांच्याबरोबरचे काही खास फोटो सोशल मीडियाच्या माध्यमातून शेअर केले आहेत. यातील एका फोटोमध्ये ती राज ठाकरे यांना पुष्पगुच्छ देताना दिसत आहे. यावेळी राज यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे देखील उपस्थित होत्या.

राज ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त प्राजक्ता माळीची पोस्ट

प्राजक्ताने राज ठाकरेंबरोबरचे सगळे फोटो एका व्हिडीओच्या स्वरुपात शेअर केले आहेत. या फोटोंना तिने मनसे पक्षाचं अँथम गाणं जोडलं आहे. अभिनेत्री कॅप्शनमध्ये लिहिते, “आदरणीय ‘आपणांस’ वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा... राज ठाकरे जी... जे करण्याची इच्छा आहे, ते काम हातात यावं. काम करताना आनंद मिळावा. त्यातून समाधान लाभावं; या वाढदिवसानिमित्त तुम्हाला माझ्याकडून व ‘प्राजक्तराज परिवाराकडून’ शुभकामना. फोटोत दिसताय त्याप्रमाणे सदैव हसत रहा, प्रसन्न रहा. खूप शुभेच्छा.”

दरम्यान, प्राजक्ताने शेअर केलेल्या पोस्टवर चाहत्यांनी कमेंट्चा वर्षाव केला आहे. कमेंट सेक्शनमध्ये अनेकांनी राज ठाकरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. अभिनेत्रीने शेअर केलेले सर्व फोटो हे ‘प्राजक्तराज’ या तिच्या ज्वेलरी ब्रँडच्या लाँचिंगदरम्यानचे आहेत. राज ठाकरे यांच्यासह त्यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी ‘प्राजक्तराज’च्या लाँचिंग कार्यक्रमाला हजेरी लावली होती. याशिवाय प्राजक्ताच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, ‘जुळून येती रेशीमगाठी’ या मालिकेमुळे अभिनेत्री घराघरांत लोकप्रिय झाली. सध्या ती ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमात सूत्रसंचालकाची भूमिका निभावत आहे. तसेच भविष्यात काही लोकप्रिय मराठी चित्रपटांमध्ये देखील प्राजक्ता झळकणार आहे.

# "पाकिस्तान संघाबद्दल बोललो तर अडचणी..."; USAच्या टी-२० वर्ल्डकपमधील अपसेटवर अमेरिकेच्या अधिकाऱ्याचे मोठे वक्तव्य






अमेरिकेच्या संघाने टी-२० विश्वचषकात अप्रतिम कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतलं आहे. आतापर्यंत झालेल्या तीन सामन्यात संघाने दोन मोठे विजय मिळवले असून भारताविरूद्धच्या सामन्यात त्यांना पराभव पत्करावा लागला. पण भारतालाही अमेरिकेने सहजासहजी विजय मिळवू दिला नाही. तर पाकिस्तानसारख्या टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावलेल्या संघाचा अमेरिकेने पराभव करत मोठा अपसेट घडवला. यादरम्यान व्हाईट हाऊसचे अधिकारी मॅथ्यू मिलर यांना यूएसए क्रिकेट संघाने T20 विश्वचषकात पाकिस्तानला पराभूत केल्याबद्दल टिप्पणी करण्यास सांगितले. याच्या उत्तरात मिलर यांनी केलेले वक्तव्य सध्या व्हायरल होत आहे.

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांनी एका पत्रकाराच्या प्रश्नावर गमतीशीर उत्तर दिले. जेव्हा त्यांना यूएसए क्रिकेट संघाने सध्या सुरू असलेल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकात अमेरिकेन पाकिस्तानला पराभवाचा धक्का दिल्याबद्दल याबद्दल विचारले गेले. प्रेस ब्रीफिंग दरम्यान, मिलर यांना एका पत्रकाराने विचारले की अमेरिका या एका सहयोगी संघाने पूर्णवेळ क्रिकेट खेळणाऱ्या पाकिस्तानविरुद्ध विजय मिळवला, यावर आपले मत मांडण्यास सांगितले. यावर बोलताना अधिका-याने सांगितले की, “जेव्हा मी माझ्या कार्य कक्षेबाहेरच्या गोष्टींवर भाष्य करतो तेव्हा मी अडचणीत सापडतो आणि मी म्हणेन की पाकिस्तान क्रिकेट संघ त्या श्रेणीमध्ये येतो.”

गेल्या आठवड्यात टी-२० विश्वचषकातील गट सामन्यात एकेकाळच्या विश्वविजेत्या पाकिस्तानला अमेरिकेसारख्या नवख्या संघाने सुपर ओव्हरमध्ये पराभवाचा धक्का दिला. दोन्ही संघांनी प्रत्येकी १५९ धावा केल्यावर, ‘सुपर ओव्हर’मध्ये विजय निश्चित झाला. सुपर ओव्हरमध्ये सुरूवातीला फलंदाजी करताना अमेरिकेने १८ धावा केल्या. या सुपर ओव्हरमधील पाकिस्तान संघाची फिल्डिंग ही खूपच सुमार दर्जाची होती आणि एका चौकारानंतर वाईड आणि एकेरी दुहेरी धावांच्या आधारे अमेरिका संघाने १८ धावा केल्या.

यानंतर सुपर ओव्हरमध्ये १८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तान अवघ्या १३ धावा करत पराभूत झाला. अमेरिकेकडून भारतीय वंशाच्या मराठमोळ्या सौरभ नेत्रावळकर शानदार गोलंदाजी केली. या पराभवामुळे पाकिस्तानचे चाहते, तज्ज्ञ आणि माजी क्रिकेटपटू निराश झाले होते. यानंतर पाकिस्तानला भारताकडून ही पराभव पत्करावा लागल्याने एकूणच संघाच्या कामगिरीवर सर्वच जण भडकले. जसप्रीत बुमराहच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने पाकिस्तानवर लो स्कोअरिंग सामन्यात ६ धावांनी विजय मिळवला.

## ऑफिसमध्ये राबणाऱ्यांसाठी चक्क नरेंद्र मोदींनीच दिले योगाचे धडे

येत्या २१ जून रोजी देशात योग दिवस साजरा केला जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली पंतप्रधान पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी जागतिक योग दिनाची सुरुवात केली होती. त्यानिमित्ताने यंदा १० वा जागतिक योग दिन साजरा केला जाणार आहे. या योग दिनानिमित्ताने देशभर योग उपक्रमांची जनजागृती झाली. अनेकांनी योगा करण्यास सुरुवात करून आयुष्यात अमूलाग्र बदल घडवून आणला आहे. आता यंदाच्या योग दिनाला अवघे ६ दिवस उरलेले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाला आपल्या आयुष्यात अविभाज्य भाग बनवण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी यासंदर्भात एक्सवर पोस्ट केली आहे. यानुसार तुम्हीही निरोगी राहण्यासाठी मोदी यांनी सांगितलेले योगा प्रकार करू शकता.

योगतज्ज्ञ कामिनी बोबडे यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.

ताडासन : ताडासन हे आसन तुमचा तणाव दूर करण्यासाठी तसेच तुमच्या मेंदूला शांत करण्यासाठी फार महत्त्वाचे आहे. तसेच या आसनामुळे शरीरावर तुमचा तोलही नीट राहतो.

त्रिकोनासन : हे पचन सुधारते आणि यकृत, स्वादूपिंड आणि पोटासाठी चांगले असते. पोट, कंबर, पाय आणि शरीराच्या बाजूच्या स्नायूंसाठी हे आसन करावे. तसेच पोटाची चरबीही कमी करते, मज्जातंतू शांत करण्यास मदत करते. कानाच्या समस्याही हे आसन केल्यानंतर दूर होण्यास मदत होते.

## अफगाणिस्तान पहिल्यांदाच सुपर८ मध्ये; न्यूझीलंड, श्रीलंकेची ‘घरवापसी’ पक्की




अफगाणिस्तान टी-२० विश्वचषक २०२४ च्या सुपर८ फेरीत पोहोचला आहे. क गटातून वेस्ट इंडिजसह अफगाणिस्तान सुपर८मध्ये धडक मारली आहे. सलग तिसरा सामना जिंकत अफगाणिस्तान सर्वाधिक नेट रन रेटसह सुपर८ साठी पात्र ठरला आहे, तर त्यांच्या विजयाने केन विल्यमसनच्या नेतृत्त्वाखालील चॅम्पियन न्यूझीलंड संघाचे टी-२० विश्वचषकातील आव्हान संपुष्टात आले आहे. तर न्यूझीलंडसोबतच बांगलादेशच्या विजयासह श्रीलंकेनेही आपला गाशा गुंडाळला आहे.

अफगाणिस्तानने या सामन्यात प्रथम पापुआ न्यू गिनीला ९५ धावांवर सर्वबाद आणि नंतर अवघ्या १५.१ षटकांत ३ गडी गमावून १०१ धावा करत विजय मिळवला. अफगाणिस्तानचा फझलहक फारूकी तुफान फॉर्मात असून ३ विकेट्स घेत या सामन्याचा सामनावीरही ठरला. आता त्यांना १८ जून रोजी यजमान वेस्ट इंडिजविरूद्ध शेवटचा साखळी सामना खेळायचा आहे.

अफगाणिस्तानच्या विजयासह क गटात मोठा बदल पाहायला मिळाला. अफगाणिस्तानच्या विजयाचा थेट परिणाम तीन संघांवर झाला आहे. आता क गटातील तीन संघ सुपर८ च्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत. ज्यामध्ये सर्वात मोठे नाव न्यूझीलंडचे आहे. न्यूझीलंडने आतापर्यंत २ सामने खेळले असून किवी संघाला एकही सामना जिंकता आलेला नाही. न्यूझीलंडसह पापुआ न्यू गिनी आणि युगांडा हे संघही विश्वचषकातून बाहेर पडले आहेत.

न्यूझीलंडचा ट्वेन्टी२० वर्ल्डकपमधला प्रवास

२००७- सेमी फायनल
२००९- दुसरी फेरी
२०१०- दुसरी फेरी
२०१२- दुसरी फेरी
२०१४- दुसरी फेरी
२०१६- सेमी फायनल
२०२१- उपविजेते
२०२२- सेमी फायनल
२०२४- प्राथमिक फेरी

बांगलादेशने नेदरलँड्सवर २५ धावांनी विजय मिळवल्याने श्रीलंका टी-२० विश्वचषक २०२४ मधून बाहेर पडला. ड गटातील तीन सामन्यांमध्ये तीन विजयांसह दक्षिण आफ्रिका सुपर८ साठी पात्र ठरणारा पहिला संघ ठरला आहे. बांगलादेश तीन सामन्यांत दोन विजय आणि ०.४७८ च्या नेट रन रेटसह दुसऱ्या स्थानावर आहे तर नेदरलँड्सचा नेट रन रेट एका विजयासह -०.४०८ आहे.

## बॉक्स ऑफिसवर एकाच दिवशी धडकणार सिनेमे?




बॉक्स ऑफिसवर एकाच दिवशी बिग बजेट सिनेमे प्रदर्शित झाले की, नेमका कोणता चित्रपट पाहायचा ही अडचण प्रेक्षकांच्या मनात निर्माण होते. साहजिकच याचा परिणाम चित्रपटांच्या संपूर्ण कलेक्शनवर होतो. गेल्यावर्षी अक्षय कुमारचा ‘OMG २’ आणि सनी देओलचा ‘गदर २’ हे दोन्ही चित्रपट एकाच दिवशी प्रदर्शित झाले होते. अर्थात प्रेक्षकांनी दोन्ही चित्रपटांना भरभरून प्रतिसाद दिला. परंतु, ‘गदर २’च्या तुलनेत अक्षयच्या ‘OMG २’च्या कलेक्शनवर परिणाम झाला. आता अशीच काहीशी परिस्थिती येत्या ऑगस्ट महिन्यात निर्माण होणार आहे.

१५ ऑगस्ट, २६ जानेवारी, ख्रिसमस, ईद, दिवाळी अशा महत्त्वाच्या दिवशी कोणते सिनेमे प्रदर्शित होणार हे साधारणत: वर्षभरापूर्वीच घोषित केलं जातं. येत्या १५ ऑगस्टला बॉक्स ऑफिसवर मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. यापूर्वी रोहित शेट्टी दिग्दर्शित ‘सिंघम ३’ येत्या १५ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार होता. ( नुकत्याच जाहीर केलेल्या तारखेनुसार ‘सिंघम ३’ दिवाळीत प्रदर्शित होईल ) यामध्ये अजय देवगण, दीपिका पदुकोण, रणवीर सिंह, टायगर श्रॉफ, करीना कपूर खान यांच्या प्रमुख भूमिका आहेत. त्यामुळे ‘सिंघम’ सीरिजचे चाहते या चित्रपटाची आवर्जुन वाट पाहत आहेत. अशातच दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुनचा ‘पुष्पा २’ देखील १५ ऑगस्टला रिलीज होणार असल्याचं निर्मात्यांनी वर्षभरापूर्वीच जाहीर केलेलं आहे. ‘पुष्पा’ चित्रपटाच्या पहिल्या भागाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. त्यामुळे ‘पुष्पा २’ सुद्धा रेकॉर्डब्रेक कमाई करेल असा अंदाज कित्येक चित्रपट समीक्षकांनी वर्तवला आहे. यामध्ये अल्लू अर्जुनसह नॅशनल क्रश रश्मिका मंदाना प्रमुख भूमिकेत झळकेल. ‘पुष्पा २’ आणि ‘सिंघम ३’ एकाच दिवशी प्रदर्शित झाल्यास कोण बाजी मारणार यावर गेले अनेक महिने चर्चा चालू असतानाच आता या दोन्ही चित्रपटांना टक्कर द्यायला येतोय श्रद्धा कपूरचा ‘स्त्री २’.

‘मुंज्या’ चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर मॅडॉक फिल्म्सने ‘स्त्री २’च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. हा चित्रपट सुद्धा १५ ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे. एकाच दिवशी तीन चित्रपट बॉक्स ऑफिसवर धडकल्यास शेवटी बाजी कोण मारणार हे पाहणं उत्सुकतेचं ठरेल परंतु, निश्चितच तिन्ही सिनेमांना याचा काही अंशी फटका बसेल.

दरम्यान, बुधवारी ( १३ जून ) समोर आलेल्या माहितीनुसार ‘पुष्पा २’च्या प्रदर्शनाची तारीख बदलण्याची शक्यता आहे. एडिटिंगचं काही काम अपूर्ण राहिल्याने ‘पुष्पा २’ची रिलीज डेट निर्माते पुढे ढकलण्याची शक्यता काही मीडिया रिपोर्ट्सकडून वर्तवली जात आहे. याशिवाय ‘सिंघम ३’च्या प्रदर्शनाच्या तारखेत सुद्धा बदल केला आहे.

## दिनविशेष

**घटना**

२०२२ : इंटरनेट एक्सप्लोरर मायक्रोसॉफ्टचे ब्रॉउसर २६ वर्षांनी बंद-
२०१२ : निक वॉलेंडा - हे नायगारा धबधब्यावर यशस्वीरित्या दोरीवर चालणारे पहिले व्यक्ती बनले.
२००८: लेहमन ब्रदर्स - या वित्तसंस्थेने दिवाळखोरी जाहीर केली.
२००१ : विजयालक्ष्मी सुब्रह्मण्यम यांनी राष्ट्रीय अ बुद्धिबळ स्पर्धा विक्रमी पाचव्यांदा जिंकली.
२००१: शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) चीन, रशिया, कझाकस्तान, किर्गिस्तान, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तान यांनी स्थापना केली.
१९९७: अजामीनपात्र गुन्ह्याचा आरोप असलेली व्यक्ती फरारी असेल, तर तिच्यावर आरोपपत्र दाखल नसतानाही न्यायमूर्ती अटक वॉरंट जारी करू शकतात असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला.
१९९४: इस्रायल व व्हॅटिकन सिटी यांमधे पूर्ण राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.

**जन्म**

१९७२ : सत्यपाल जैन भारतीय वकील आणि अतिरिक्त सॉलिसिटर जनरल
१९५० : लक्ष्मी मित्तल - किंग ऑफ स्टील, भारतीय इंग्रजी व्यापारी पद्मा विभूषण
१९४७ : प्रेमानंद गज्वी- साहित्यिक आणि नाटककार
१९३७ : अण्णा हजारे - थोर समाजसेवक पद्म भूषण, पद्मश्री
१९३३ : सरोजिनी वैद्य - लेखिका (निधन: ३ ऑगस्ट २००७)
१९३२: झिया फरिदुद्दीन डागर धृपद गायक (निधन: ८ मे २०१३)
१९२९ : सुरैय्या - गायिका व अभिनेत्री (निधन: ३१ जानेवारी २००४)
१९२८ : शंकर वैद्य साहित्यिक

**निधन**

२०२२ : गोपीचंद नारंग - भारतीय साहित्य समीक्षक पद्म भूषण, पद्मश्री (जन्म: ११ फेब्रुवारी १९३१)
२०२२ : के. के. वीरप्पन भारतीय राजकारणी, तामिळनाडूचे आमदार
२०२० : कर्नल बिक्कुमल्ला संतोष बाबू भारतीय सैन्य अधिकारी
२०१६ : असलम फारुखी - भारतीय- पाकिस्तानी भाषाशास्त्रज्ञ, लेखक आणि विद्वान (जन्म: २३ ऑक्टोबर १९२३)
२०१३: मनिवंनान - भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक (जन्म: ३१ जुलै १९५४)
२००२ : चोई हाँग हाय तायक्वोंडो मार्शल आर्टचे निर्माते (जन्म: ९ नोव्हेंबर १९१८)
१९९१: डब्ल्यू. आर्थर लुईस
सेंट लुसियन - बार्बेडियन अर्थशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पुरस्कार (जन्म: २३ जानेवारी १९१५)
१९८३: श्रीरंगम श्रीनिवास राव तेलुगू कवी गीतकार - साहित्य अकादमी पुरस्कार (जन्म: ३० एप्रिल १९१०)

## राशि भविष्य

**मेष** — तुम्ही बालपणीच्या आठवणींमध्ये रमाल. या प्रक्रियेत तुम्ही विनाकारण मानसिक त्रास करून घ्याल. सदोदित तुमच्यातील लहान मूल कार्यरत ठेवण्याची तुमची क्षमता गमावून बसलात हे तुमच्या चिंतेचे मुख्य कारण ठरेल. त्यामुळे तुम्ही त्रस्त व्हाल.

**वृषभ** — आपला आहार नियंत्रणात ठेवा आणि तंदुरुस्त राहण्यासाठी नियमित व्यायाम करा. भाऊ बहिणींच्या मदतीने आज तुम्हाला आर्थिक लाभ मिळू शकेल. भाऊ बहिणीचा सल्ला घ्या. इतरांचे लक्ष वेधून घेण्यासाठी तुम्हाला फारसे काही प्रयत्न करावे लागणार नाहीत कारण आजचा दिवस तुमच्यासाठी भला आहे.

**मिथुन** — नैराश्याच्या जाणीवेला तुमच्यावर हावी होऊन देऊ नका. दिवसाच्या उर्वरित काळात पैशांची स्थिती सुधारेल. नातेवाईक आणि मित्रांना आपल्या आर्थिक बाबीचे व्यवस्थापन करू देऊ नका, अन्यथा आपले अंदाजपत्रक कोलमडू शकते. प्रिय व्यक्तीने दुस्वास केला तरी तुम्ही प्रेमाने वागा.

**कर्क** — तुमच्या इच्छा प्रत्यक्षात येण्यासाठी तुमचे विचार आणि ऊर्जा वापरा, केवळ कल्पनाविश्वात रमण्यात काहीही अर्थ नाही. तुम्ही केवळ विचार करता, प्रयत्न करत नाही हा तुमचा खरा प्रश्न आहे. जर तुमची धन संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आटलेली असेल तर आज त्यात तुम्हाला विजय मिळू शकतो आणि तुम्हाला धन लाभ ही होऊ शकतो.

**सिंह** — प्रेम, आशा, विश्वास, सद्भावना, आशावादी आणि निष्ठा अशा सकारात्मक भावना स्वीकारण्यासाठी तुमच्या मनाला उद्युक्त करा. एकदा का अशा भावनांनी तुमच्या मनाचा ताबा घेतला की, कोणत्याही परिस्थितीत तुमचे मन आपसूकपणे सकारात्मक विचार करेल.

**कन्या** — आपल्या आकांक्षा आणि महत्वाकांक्षाना धक्का लागण्याची शक्यता आपल्या पत्रिकेत मोठ्या प्रमाणात दिसून येते. ही परिस्थिती हाताळण्यासाठी योग्य सल्ल्याची आपणास गरज आहे. कोणतीही गुंतवणूक घाईगडबडीत करू नका. गुंतवणुकीचा सर्व बाजूंनी विचार केल्याशिवाय पुढे जाऊ नका, अन्यथा नुकसान होऊ शकते.

**तूळ** — आरामात राहण्याचा आनंद आज लुटू शकाल. आज या राशीतील काही बेरोजगार लोकांना नोकरी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. आपल्या घरातील वातावरण बदलण्यापूर्वी तुम्हाला सर्वांचा होकार असल्याची खात्री करा. कुणीतरी तुम्हाला शुभेच्छा देईल, अभिनंदन करील.

**वृश्चिक** — प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. आज तुम्हाला धन संबंधित काही समस्या असण्याची शक्यता आहे परंतु, तुम्ही तुमच्या कौशल्याने हानीला ही नफ्यामध्ये बदलू शकतात. आपण ज्याची काळजी करतो अशा व्यक्तीशी संवाद न झाल्यामुळे उदासवाणा दिवस. प्रेमाचा सकारात्मक चेहरा दिसण्याची शक्यता.

**धनु** — आरोग्य एकदम चोख असेल. पैश्याची किंमत तुम्ही चांगल्या प्रकारे जाणतात म्हणून आजच्या दिवशी तुमच्या द्वारे वाचवलेले धन तुमच्या खूप कामी येऊ शकते आणि तुम्ही कुठल्या मोठ्या अडचणींमधून निघू शकतात. इतरांवर प्रभाव टाकण्याची क्षमता तुम्हाला बक्षीस मिळवून देईल.

**मकर** — आज तुम्हाला जादुई असे आशादायी वातावरण अनुभवास येईल. आपल्यासाठी पैसा वाचवण्याची इच्छा पूर्ण होऊ शकते. आज तुम्ही योग्य बचत करण्यात यशस्वी व्हाल. आज कामकाज धकाधकीचे, थकविणारे ठरेल - परंतु तुमची मित्रमंडळी सोबत असल्यामुळे तुम्ही आनंदी आणि श्रांत मनोवृत्तीत राहाल.

**कुंभ** — दु:खात असलेल्या व्यक्तीला मदत करून तुम्ही ऊर्जा मिळवा. इतरांच्या उपयुक्त ठरत असेल तर मदत करणे हेच संयुक्तिक आहे नाहीतर नश्वर देहाचा उपयोग तो काय ही बाब लक्षात ठेवा. दिवसाच्या उत्तरार्धात आर्थिक स्थिती सुधारेल. नातवंडे ही आपल्यासाठी अपरिमित आनंदाचा स्रोत असतील.

**मीन** — तुमचे व्यक्तिमत्व आज एखाद्या अत्तरासारखे काम करील. तुमचे धन तुमच्या कामी तेव्हाच येते जेव्हा तुम्ही व्यर्थ खर्च करण्यात स्वत:ला थांबवतात ही गोष्ट आज तुम्हाला चांगल्या प्रकारे लक्षात येईल. जोडीदाराबरोबर योग्य तो ताळमेळ साधल्यास तुमच्या घरी सुख-समृद्धी व शांतता नांदेल.

# निराधार वृद्धांना आसरा व मोफत उपचार, 'युथ फॉर चेंज'चा मदतीचा हात

● वर्धा : निराधार वृद्धांच्या अडचणी सोडवून त्यांना सन्मानाने जगण्याचा मार्ग उपलब्ध करून देण्याचा उपक्रम 'युथ फॉर चेंज' संस्थेच्या माध्यमातून युवक राबवित आहे. समाजात अनेक वृद्ध नागरिक कोणत्याही आधाराशिवाय जगत असल्याचे दिसून येते. या दुर्लक्षित तेवढेच असुरक्षित असलेल्या वृद्धांची अवस्था दयनीय असून त्यांचे जीवन गंभीर संकटात सापडल्याचे पाहून युथ फॉर चेंज या युवकांच्या संघटनेने मदतीचा हात देणे सुरू केले आहे.

प्रामुख्याने बेघर असलेल्या वृद्धांना वैद्यकीय मदत मिळवून देत त्यांच्या निवासाची व्यवस्था करून दिल्या जात आहे. तरूणांचे हे कार्य पाहून समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थांनी मदतीचा हात पण पुढे केला. ॲड.गुरुराज राऊत व पवन मिरासे यांनी संस्थेच्या माध्यमातून पुढाकार घेत अनेकांना आसरा दिला.

वर्धा सामान्य रूग्णालय परिसरात गोंधळलेल्या परिस्थितीत मोहम्मद सय्यदभाई आढळून आले होते. लोखंडी शटरला ग्रीस मारण्याचे काम करीत ते उपजीविका करायचे. मात्र शारिरीक असाह्यता आल्याने त्यांना सेवाग्रामच्या रूग्णालयात संस्थेचे अभिजीत साळवे यांनी दाखल केले. उपचार सुरू असून त्यांची निवासाची व्यवस्था सेवाश्रमात करण्यात आली आहे. बजाज चौकात पायाला मोठी दुखापत झाल्याने शोभा मटकी या वृद्ध महिलेस सरकारी दवाखान्यात नेवून उपचार करण्यात आले.



तीन महिन्यापासून वर्धा बस स्थानकावर अनाथ अवस्थेत राहणाऱ्या प्रल्हाद नारायण गाडगे यांना प्रेम मंदिर वृद्धाश्रमात आवश्यक तो उपचार करून ठेवण्यात आले आहे. महिन्याभरापूर्वी इतवारा परिसरात बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या बंडोजी ढोक या वृद्धास गंभीर स्थिती पाहून सामान्य रूग्णालयात दाखल करीत त्यांचा जीव वाचविण्यात यश आले. राष्ट्रसंत चौकातील दम्याच्या विकाराने ग्रस्त असलेल्या परसराम खोब्रागडे यांना सामान्य रूग्णालयात दाखल करीत उपचार सुरू करण्यात आले आहे.

ब्राम्हणवाडा गावातील वृद्ध डोमाजी खडसे हे अनाकलनीय वेदनांनी त्रस्त होते. त्यांना वैद्यकीय सेवा मिळवून देण्यात आली. बोरगाव ते वर्धा मार्गावर मृत्यूच्या उंबरठ्यावर असल्याच्या स्थितीत लक्ष्मणजी मोहरले दिसून आले. त्यांनी आता सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच हात तुटलेल्या अवस्थेतील बबनराव लोखंडे, नेत्रविकाराने ग्रस्त लक्ष्मी पांडुरंग मडावी ही ७५ वर्षीय वृद्धा, कानगाव शिवार, मालगुजारीपुरा, इतवारा आदी ठिकाणी असहाय्य वृद्ध मंडळी आढळून आली होती. त्यांना योग्य तो उपचार व आसरा मिळवून देण्याचे काम या तरूणांनी केले आहे. तरूण वकीलीचा व्यवसाय करणारे युवा गुरूराज राऊत व त्यांचे सहकारी अश्या अनाथ वृद्धांची माहिती मिळाल्यावर तत्परतेने धाव घेत अपेक्षित ती मदत करीत आहे.

ॲड.राऊत म्हणतात की राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या भजनातून 'गिरते को उठाना धर्म मेरा' असे सांगून गेले आहे. दैनंदिन जीवनात सेवेच्या कार्यास पण वेळ देणे हा मनुष्यधर्म असून तो पाळण्याचे हे कार्य होय, असे राऊत सांगतात. आजवर केलेल्या मदतीत शिवाजी चौधरी, चंद्रशेखर राठी, नावेद शेख, अभिजीत साळवे व रूचिता फेंडर यांचे योगदान लाभले आहे.

# वीज केंद्रातील बिघाडाने सिन्नर औद्योगिक वसाहतीला झळ, तीन दिवस पाणी पुरवठा ठप्प

● नाशिक – एकलहरे वीज केंद्रातील तांत्रिक बिघाडाचा फटका नाशिकमधील रहिवाशांसह सिन्नर औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना बसला. पंपिंग केंद्रात वीज नसल्याने सिन्नर औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना तीन दिवस पाणी पुरवठा होऊ शकला नाही. उद्योजकांचे प्रचंड हाल झाले. अनेकांना टँकरने पाण्याची व्यवस्था करावी लागली. भविष्यात पुन्हा ही स्थिती उद्भवू नये म्हणून मऔविमने पर्यायी व्यवस्था करावी, सिन्नरसाठी स्वतंत्र जनित्र देण्याची मागणी उद्योजकांनी केली आहे.

वीज पुरवठा खंडित झाल्याने सिन्नर औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले. सिन्नर औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक अपुऱ्या मूलभूत सुविधांमुळे त्रस्तावलेले आहेत. यात सलग तीन दिवस पाणी पुरवठाच खंडित झाल्याने



अडचणीत भर पडली. या संदर्भात निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे आणि उद्योजकांनी मऔविमचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब झांज्जे यांची भेट घेतली. सिन्नर निमाचे पदाधिकारी किरण वाजे ,सुधीर बडगुजर, विश्वजित निकम, प्रविण वाबळे यांनी वसाहतीतील स्थिती मांडली. सिन्नर वसाहतीला वीज पुरवठा करणाऱ्या नाशिकरोड येथील रोहित्रात बिघाड होता. त्यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचे झांज्जे यांनी लक्षात आणून दिले. उद्योजकांना सामोरे जावे लागलेल्या अडचणींची माहिती दिल्यानंतर महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला गेला. पंपिंग केंद्रातील एक पंप तातडीने सुरू करण्यात यश आले. दुसरा पंपही सुरू करून सिन्नरच्या औद्योगिक क्षेत्राचा पाणी पुरवठा सुरळीत झाल्याचे झांज्जे यांनी सांगितले.

भविष्यात असा प्रकार घडणार नाही, याची काळजी घेण्याची गरज आहे. पर्यायी व्यवस्था म्हणून जनित्राची व्यवस्था करावी, असेही उद्योजकांनी सुचवले. त्याची अंमलबजावणी करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. सिन्नर औद्योगिक वसाहतीत जे सेक्टरसाठी आवश्यक असलेल्या रस्त्यासाठी १३.९३ हेक्टर औद्योगिक क्षेत्र वगळून रस्ता करण्याबाबत चर्चा झाली. सांडपाण्याचा निचरा, विजेचा लपंडाव, रस्त्यांची दुरवस्था याबाबतही व्यापक चर्चा झाली. सातपूर व अंबड वसाहतीतील नाले साफसफाई, रस्ते दुरुस्ती, सातपूर येथील सिएटचा पूल पाडून ठेवल्याने वाहतुकीला होणारा अडथळा आदी प्रश्न मांडले गेले. याबाबत महापालिकेबरोबर बैठक घेऊन लवकर हा प्रश्न निकाली काढावा, अशी सूचना निमा पदाधिकाऱ्यांनी केली.

# दरड कोसळल्याने अनुस्कुरा घाटातील वाहतूक विस्कळीत; कोल्हापूर - कोकण वाहतुकीवर परिणाम

● कोल्हापूर : पावसाला नुकतीच कोठे सुरुवात झाली असताना दरडी कोसळण्याचे प्रकार घडू लागले आहेत. अनुस्कुरा घाटामध्ये दरड कोसळली आहे. यामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण मार्गाला होणारी या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. गेल्या वीस तासाहून अधिक काळ दरडोळ करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या वर्षीच्या पावसाळ्यातील दरड कोसळण्याची ही या भागातील पहिलीच घटना आहे.

कोल्हापूर जिल्ह्याला जोडणाऱ्या राजापूर तालुक्यातील अणुस्कुरा घाटात काल सायंकाळी दरड कोसळल्याने वाहतूक खोळंबली आहे. दरम्यान काल सायंकाळी साडेसहा वाजता पडलेली दरड काढण्याचे अद्यापही सुरू आहे. यामुळे तब्बल १५ तासांहून अधिक काळ रस्ता बंद असल्याने या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. काल दिवसभर राजापूर तालुक्यात पावसाची रिपरिप सुरू होती. तर यंदाच्या वर्षातील दरड कोसळण्याची ही पहिलीच घटना आहे.

घाटातील सुरक्षित प्रवासासह घाटाच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. दरम्यान,



घाटातील रस्त्यात सायंकाळी कोसळलेली दरड आणि माती काढून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तात्काळ प्रयत्न सुरू झाले आहेत. परंतु मोठमोठे दगड आणि दरडीचा भाग जास्त प्रमाणात कोसळल्याने तब्बल १५ तासांहून अधिक काळ मार्ग मोकळा करण्याचे काम सुरू आहे. तशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता स्वप्नील बावधनकर यांनी दिली.

हे काम युद्ध पातळीवर सुरू असल्याने लवकरच रस्ता वाहतुकीसाठी मोकळा होणार असल्याची माहिती देण्यात आली. गत आठवड्यापासून मॉन्सून सक्रिय झाला असून तेव्हापासून तालुक्यामध्ये कमी-जास्त प्रमाणात पाऊस होत आहे. मागच्या २४ तासांत राजापूर तालुक्यात पावसाचा जोर वाढल्याने बाकाळे येथे घरांचे नुकसान झाले तर सायंकाळी उशिरा अणुस्कुरा घाटात दरड कोसळल्याची घटना घडली.

या मार्गावर दगड आणि मोठ्या प्रमाणात माती रस्त्यावर आल्याने घाटरस्ता वाहतुकीसाठी बंद झाला आहे. वाहनांची नियमित वर्दळ असलेल्या या घाटात दरड कोसळल्याने वाहतूक खोळंबली आहे. कोकणामध्ये ये-जा करण्यासाठी शॉर्टकट मार्ग म्हणून या घटमार्गाची ओळख आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातून कोकणाला जोडणारा पर्यायी मार्ग म्हणून अणुस्कुरा घाट महत्वाचा आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील अनेकजण कोल्हापुरात याच मार्गाने दळणवळणासाठी याच मार्गाचा वापर करतात.

परंतु मागच्या काही वर्षा या घाटात दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढल्याने जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. तर रस्त्यांचीही काही ठिकाणी दुरवस्था झाल्याने वाहनधारकांना वाहन चालवताना कसरत करण्याची वेळ येत आहे.

# रत्नागिरी जिल्ह्यात पावसाची संततधार

पुढील काही दिवस मुसळधार शक्यता



● रत्नागिरी : जिल्ह्यात बुधवार रात्रीपासून पावसाचा जोर वाढला आहे. गुरुवारी सकाळपासून जोर अधिकच वाढला असून दिवसभर संततधारेने पाऊस सुरू होता. त्यामुळे हवेत गारठा निर्माण झाला. गेल्या २४ तासात जिल्ह्यात सरासरी २५.३२ मिलीमीटर पाऊस नोंदविला गेला असून आतापर्यंत १८८.३७ मिलीमीटर सरासरी पाऊस पडला आहे. सर्वाधिक पाऊस चिपळूण आणि रत्नागिरी तालुक्यात पडल्याची नोंद जिल्हा नियंत्रण कक्षाकडे झाली आहे.

गेल्या तीन- चार दिवसांपासून रात्री पाऊस आणि दिवसा ऊन, असे पावसाचे चित्र होते. मात्र, बुधवार रात्रीपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. गुरुवारी सकाळी थोडासा पाऊस थांबला होता. मात्र, सकाळी ११ वाजेपासून तो पुन्हा सुरू झाला. दुपारनंतर तर मुसळधार सुरू झाली. सायंकाळपर्यंत पाऊस संततधारेने पडत होता.

दरम्यान, अरबी समुद्रात मान्सूनची वाटचाल अधिक वेगाने झाल्याने कोकण किनारपट्टी भागात येत्या काही दिवसांत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. त्यामुळे पुढील काही दिवस जिल्ह्यात जोरदार पाऊस पडणार असल्याची चिन्हे दिसत आहेत.

# इचलकरंजी महापालिकेत आयुक्तपदाचा वाद रंगला

## अखेर ओमप्रकाश दिवटे यांनी पदभार स्वीकारला




● कोल्हापूर : इचलकरंजी महापालिकेमध्ये गेले तीन दिवस आयुक्तपदाच्या आट्यापाट्याचा खेळ रंगला आहे. तर आजची सकाळ अधिकृत आयुक्त कोण? यावरून दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये वाद रंगला. साताऱ्याहून आलेल्या पल्लवी पाटील यांनी आपल्याला आदेश नसण्याचे सांगत आयुक्त पदाच्या खुर्चीवर दावा केला. तर ओमप्रकाश दिवटे यांनी स्थगिती मिळाली असल्याचे सांगून हा पदभार आपल्याकडे असल्याचे स्पष्ट केले. अखेर मंत्रालयातून फोन आल्यानंतर या खुर्चीवर ओमप्रकाश दिवटे हे स्थानापन्न झाले.

इचलकरंजी महापालिकेचे आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांना बदलण्यासाठी एक राजकीय यंत्रणा कार्यरत होती. त्यातून दोन दिवसांपूर्वी त्यांच्याऐवजी साताऱ्याच्या पल्लवी पाटील यांची नियुक्ती झाली. त्यांनी येऊन पदभार स्वीकारला होता. तथापि त्यानंतर ओमप्रकाश दिवटे यांनी मॅटमध्ये धाव घेतली होती. मॅटने पुन्हा दिवटे यांच्याकडे सूत्रे सोपवण्याचे आदेश काल सायंकाळी दिले होते. त्यानुसार आज दिवटे महापालिकेत गेले. पण तत्पूर्वीच पल्लवी पाटील या आयुक्त पदाच्या खुर्चीत स्थानापन्न झाल्या होत्या. त्यावरून अधिकृत आयुक्त कोण ? यावरून वाद सुरू झाला. अखेर मंत्रालयातून फोन आल्यानंतर दिवटे यांच्याकडे पदभार सोपवण्यात आला आहे. मात्र यावरून आज सकाळीच महापालिकेतील दोन वरिष्ठ अधिकाऱ्यातील वादाची चांगली चर्चा सुरू होती.

# Kerala CM Pinarayi Vijayan, Union Minister pay homage to victims of blaze

● New Delhi: Kerala Chief Minister Pinarayi Vijayan, Union Minister of State for External Affairs Kirti Vardhan Singh along with other Ministers paid homage to the victims of the Kuwait building fire at Cochin International Airport. An Indian Air Force (IAF) aircraft carrying the bodies of 46 Indians killed in the fire arrived at 10:30 am in Kochi. The mortal remains of the victims will be taken to their native places including those from Tamil Nadu and Karnataka. The flight will then leave for Delhi with mortal remains of victims from other states.

What has initial probe revealed? Indian embassy officials met the Kuwait fire incident survivors and investigators on Thursday and glaring lapses have emerged from the initial probe. Sources told The Indian Express there were around two dozen gas cylinders on the ground floor of the seven-storey building, inflammable materials like paper, cardboard and plastic as partitions to separate the workers in the cramped rooms and locked doors to the rooftop that did not allow workers to escape to the rooftop.



What's the death toll ? According to Kuwaiti officials, 46 of the 49 dead have been identified as Indians and three from Philippines. About 50 others were injured in the Wednesday night blast in the building that housed 196 migrant workers in Mangaf, south of Kuwait City. Kuwait Building Fire Live Updates: Death of workers underlines vulnerability of Indian migrants

The death of 46 Indian workers in a fire in Kuwait is a reminder of the dismal working conditions of a large, and often ignored, section of the Indian diaspora. The labour camp that was gutted on Wednesday was reportedly packed beyond capacity. The rapid spread of the blaze and the high number of casualties indicate that the six-storey building did not have adequate safety provisions, such as fire exits and fire-fighting equipment.

# Delhi HC seeks police stand on Bibhav Kumar's bail plea



● Delhi - The Delhi High Court on Friday sought the Delhi Police's stand in the regular bail plea of Chief Minister Arvind Kejriwal's aide Bibhav Kumar in a case pertaining to the alleged assault of Aam Aadmi Party (AAP) Rajya Sabha MP Swati Maliwal last month.

A single-judge bench of Justice Amit Sharma issued notice to the police asking them to file their status report in the matter. The high court further said that the status report would also "show the status of the investigation in the case".

Arrested on May 18, Kumar moved the high court after the trial court denied him bail on June 7.

During the hearing, senior advocate N Hariharan, appearing for Kumar, urged the court to list the matter earlier arguing that Kumar had been in custody for over a month in a case where there were "no injuries at all".

More than 30 days I have spent in custody in an offence like this. Why am I required? They had themselves sought a police remand...nothing has come out of it," Hariharan said.

The Delhi Police submitted that the investigation was "still going on and it will take some time".

# After a prayer with wife beside him, Chandrababu Naidu gets to work, starts by scrapping Jagan legislation

● Hyderabad - Scrapping the controversial Land Titling Act, sanctioning teacher recruitment and skill census, increasing social welfare pensions, and reviving Anna canteens — these are the five key decisions that Telugu Desam Party's N. Chandrababu Naidu took Thursday evening after he took charge as the state's chief minister for the fourth time.

Significantly, his first act as CM was to scrap the highly controversial Land Titling Act, enacted by the previous Y.S. Jagan Mohan Reddy government. This



legislation had become a major election issue in the assembly polls, with Naidu's TDP alleging that it could be misused to grab or entangle immovable properties that did not have the requisite documentation — including ancestral lands — in endless litigations. Naidu also signed files related to these at the Amaravati Secretariat — giving his stamp of approval to implement some of the promises he made during his election campaign. These decisions are to be implemented immediately.

As priests chanted hymns, Naidu, with his wife Bhuvaneswari beside him, took charge in a special chamber in Block 1 of the Secretariat after 4:45 pm.

The second file pertained to recruitment for 16,347 teacher posts under the District Selection Committee. He also approved proposals to increase social welfare pensions to Rs 4,000/month, conducting skill census among youth and reviving the 'Anna' canteens.

A flagship initiative under the previous Naidu government, breakfast at the Anna canteen cost Rs 5/ plate while other meals cost between Rs 5 and Rs 15/ plate. The YSR government scrapped the programme after it came to power.

Before he took charge as CM, Naidu visited the Lord Venkateshwara temple at Tirumala and the Sri Druga temple at Vijayawada to offer his prayers before heading to Amaravati. Besides Naidu, 24 ministers, including Jana Sena Party chief Pawan Kalyan and the CM's son Nara Lokesh Naidu — a first-time MLA — were also sworn in Wednesday. Although the official announcement is still awaited, Pawan Kalyan is likely to be made deputy CM.

# सरकार स्थापन होताच जगन्नाथ पुरी मंदिराचे चारही दरवाजे उघडण्याला भाजपाने दिले प्राधान्य

● मुंबई, प्रतिनिधी :



ओडिशा - ओडिशा येथे लोकसभा आणि विधानसभेच्या एकत्रित निवडणुका पार पडल्या. विधानसभा निवडणुकीत भाजपाला बहुमत मिळाले, पहिल्यांदाच ओडिशात भाजपाचे सरकार स्थापन झाले आणि मोहन चरण माझी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. भाजपाने निवडणूक प्रचारात अनेक आश्वासने दिली होती. आता सरकार स्थापन होताच भाजपा एकापाठोपाठ एक निर्णय घेताना दिसत आहे. मात्र, यात भगवान जगन्नाथाला समर्पित असणाऱ्या पुरीच्या जगन्नाथ मंदिराचे चारही दरवाजे उघडण्याला भाजपा सरकारने प्राधान्य दिले. यामागील नेमके कारण काय? हे दरवाजे बंद का होते? त्यांचे महत्त्व काय? याविषयी थोडक्यात जाणून घेऊ या.

ओडिशाचे नवे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी शपथ घेतल्याच्या दुसऱ्याच दिवशी गुरुवारी (१३ जून) पुरी येथील जगन्नाथ मंदिराचे चारही दरवाजे भाविकांसाठी उघडण्यात आले. "भगवान जगन्नाथाच्या आशीर्वादाने भाजपाने ओडिशात सरकार स्थापन केले. आमच्या पक्षाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे, आम्ही आमच्या मंत्रिमंडळात मंजूर केलेला पहिला प्रस्ताव मंदिराचे चारही प्रवेशद्वार उघडण्याचा होता," असे माझी यांनी माध्यमांना सांगितले.

नवीन पटनाईक यांच्या नेतृत्वाखालील बिजू जनता दल सरकारने १२ व्या शतकातील या मंदिराचे चारपैकी तीन प्रवेशद्वार बंद ठेवले होते. चार वर्षांनंतर हे दरवाजे भाविकांसाठी खुले करण्यात आले. पुरीचे जगन्नाथ मंदिर, राज्यासह संपूर्ण देशातील सर्वात मान्यताप्राप्त हिंदू देवस्थानांपैकी एक आहे. हे देवस्थान भगवान जगन्नाथांना समर्पित आहे.

## चार दरवाजांचे महत्त्व

जगन्नाथ मंदिराचे चार दरवाजे त्याच्या सीमाभिंतीच्या मध्यभागी आहेत. पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण अशा चार दिशांकडे हे दरवाजे आहेत. या दरवाज्यांना वेगवेगळया प्राण्यांची नावे देण्यात आली आहेत. मुख्य पूर्वाभिमुख प्रवेशद्वाराला सिंहद्वार म्हणतात, ज्यात सिंहांची दोन दगडी शिल्पे आहेत. प्रचलित मान्यतेनुसार, जे या दरवाजातून प्रवेश करतात त्यांना मोक्ष (जन्म-पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्ती) प्राप्त होते.

उत्तरेकडील द्वाराला हस्तीद्वार, दक्षिणेकडील दरवाज्याला अश्वद्वार आणि पश्चिमेकडील प्रवेशद्वाराला व्याघ्रद्वार म्हणून ओळखले जाते. प्रचलित मान्यतेनुसार, अश्वद्वारातून प्रवेश केल्याने काम (वासना) कमी होते. अश्वद्वाराला विजयाचे प्रतीकही मानले जाते. व्याघ्रद्वारातून प्रवेश केल्याने धर्माचे पालन करावे ही जाणीव होते. विशेषतः भक्त आणि संतगण या दारातून प्रवेश करतात आणि हस्तीद्वारातून प्रवेश केल्याने संपत्ती प्राप्त होते.

# कोणत्याही आव्हानाला तोंड देण्यासाठी सैन्यदले सज्ज

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचा विश्वास



● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

सैन्यदलांचे आधुनिकीकरण करून राष्ट्रीय सुरक्षा अधिक बळकट करण्यावर नवे सरकार भर देईल. देशांतर्गत संरक्षण उत्पादनात लक्षणीय वाढ झाली असून त्यांचा देशाला फायदा होईल, असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी गुरुवारी सांगितले. प्रत्येक आव्हानाला तोंड देण्यासाठी सैन्यदले सज्ज असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राजनाथ सिंह यांनी गुरुवारी संरक्षणमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला. पुढील पाच वर्षासाठी आपले ध्येय सांगताना सिंह म्हणाले, ''सध्या संरक्षण निर्यात २१,०८३ कोटी असून २०२८-२९ पर्यंत त्यांत ५० हजार कोटी रुपयांपर्यंत वाढ करण्यासाठी सरकार तत्परतेने काम करेल. सैन्यदलांना अत्याधुनिक शस्त्रांनी सुसज्ज केले जात असून प्रत्येक आव्हानाला सामोरे जाण्यासाठी ते सज्ज आहेत.''

संरक्षणसज्जता वाढवण्यासाठी आणि संरक्षणामध्ये 'आत्मनिर्भरता' आणण्यासाठी आणि प्रमुख योजना आणि उपक्रमांच्या जलदगतीने अंमलबजावणी करण्यासाठी नियमित आढावा बैठका घेतल्या जातील, असे संरक्षणमंत्र्यांनी सांगितले. पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच सिंह यांनी मंत्रालयाच्या पहिल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यावरील बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविले.

# लोकसभा निवडणुकीत उमेदवारांनी गमावली १६.४ कोटींची अनामत रक्कम

सर्वाधिक रक्कम गमावणारे उमेदवार कोणत्या पक्षाचे?



● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी ५४३ जागांसाठी रिंगणात उतरलेल्या ८,३६० उमेदवारांपैकी ७,१९४ उमेदवारांनी एकूण १६.३६ कोटी रुपयांच्या त्यांच्या सुरक्षा ठेवी गमावल्या, असे निवडणूक आयोगाच्या डेटावरून दिसून आले.

उमेदवारांना त्यांच्या संबंधित मतदारसंघात एकूण वैध मतांपैकी एक षष्ठांश मते न मिळाल्यास अनामत रक्कम जप्त केली जाते. यंदाच्या निवडणुकीत कोणत्या पक्षातील उमेदवारांची सर्वाधिक अनामत रक्कम जप्त करण्यात आली? यावर एक नजर टाकू या.

# ॲमेझॉन इंडियाची कर्मचाऱ्यांना अमानवीय वागणूक

## 'टार्गेट' पूर्ण करण्यासाठी शौचालय, पाणी, चहावर बंदी

● हरियाणा, प्रतिनिधी :




जगविख्यात ॲमेझॉन कंपनीत कर्मचाऱ्यांना अमानवीय वागणूक देत असल्याची माहिती समोर आली आहे. ॲमेझॉन कंपनीच्या हरियाणामधील मानेसर येथे असलेल्या गोदामातील कर्मचाऱ्यांना ठरलेले टार्गेट पूर्ण करण्यासाठी छळ केला जात असल्याची तक्रार कर्मचाऱ्यांनी केली आहे. २४ वर्षीय कर्मचाऱ्याने सांगितले की, आम्ही आठवड्यातून पाच दिवस रोज दहा तासांची शिफ्ट करतो. यावेळी आमचे वरिष्ठ अधूनमधून शौचालयात जाऊन कुणी वेळ घालवत आहे का? हे तपासतात. महिन्याला फक्त १०,०८८ इतके अत्यल्प वेतन मिळत असताना त्यात आम्हाला शौचालयास जायला आणि पाणी पिण्यासही निर्बंध घातलेले आहेत. इंडियन एक्सप्रेसने यासंबंधी सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले आहे. नेसर येथील गोदामात काम करणाऱ्या आणखी एका कर्मचाऱ्याने सांगितले की, दहा तासांच्या शिफ्टमध्ये आम्ही जेवण आणि चहासाठीचा ३० मिनिटांचा ब्रेक जरी टाळला तरी आम्ही चार ट्रकपेक्षा अधिक पार्सल लोड करू शकत नाही. दोन दिवसांपूर्वीच आम्हाला वरिष्ठांनी पाणी पिण्यासाठी आणि शौचालयाला न जाण्याची शपथ दिली आहे. या माध्यमातून आमचे ठरलेले लक्ष्य गाठण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

इंडियन एक्सप्रेसने कर्मचाऱ्यांनी केलेले आरोप समोर आणल्यानंतर ॲमेझॉन इंडियाच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले जात आहेत. यानंतर ॲमेझॉन इंडियाच्या प्रवक्त्यांनी आपली बाजू मांडली. "या तक्रारी कुणी केल्या, याची आम्ही तपासणी करत आहोत. पण अशाप्रकारची वागणूक आम्ही कर्मचाऱ्यांना देत नाहीत. आमच्या व्यावसायिक व्यवस्थेत अशा अमानवीय गोष्टींना जागा नाही. जर अशा तक्रारी सत्य असल्याचे आमच्या निदर्शनास आले, तर आम्ही तात्काळ त्यावर निर्णय घेऊ. आमच्या व्यवस्थापकांना कर्मचाऱ्यांचे आरोग्य, सुरक्षा अबाधित राखण्यासंदर्भात पुन्हा एकदा प्रशिक्षण दिले जाईल", अशी बाजू प्रवक्त्यांनी मांडली.

हरियाणात ज्या तक्रारी आल्या, तशाच प्रकारच्या तक्रारी २०२२ आणि २०२३ साली अमेरिकेतील कर्मचाऱ्यांनीही केल्या होत्या. ॲमेझॉनमध्ये काम करणे हे महिला कर्मचाऱ्यांसाठी आणखी आव्हानात्मक असते, असेही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. महिला कर्मचाऱ्यांनी सांगितले, "ॲमेझॉनच्या गोदामात महिलांसाठी वेगळी रूम नाही. जर कुणाला अस्वस्थ वाटत असेल तर थेट शौचालय किंवा लॉकर रुममध्ये जावे लागते. बेड असलेली एक खोली आहे, मात्र तिथे गेल्यावर १० मिनिटांतच कर्मचाऱ्यांना बाहेर काढले जाते. मी दिवसाचे नऊ तास पूर्णवेळ उभी राहून काम करते. या वेळेत मला ६० मोठे आणि ४० मध्यम आकाराचे बॉक्स प्रॉडक्टसह पॅकिंग करायचे असतात."

# वायनाडमधून प्रियांका गांधी लढणार

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :



यंदाच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस नेते राहुल गांधी हे उत्तर प्रदेशातील रायबरेली आणि केरळातील वायनाडमधून विजयी झाले होते. नियमांनुसार त्यांना एक जागेचा राजीनामा द्यावा लागणार आहे. त्यानुसार राहुल हे रायबरेलीचे खासदार म्हणून कार्यरत राहणार असून, वायनाडची जागा ते रिक्त करणार आहे. वायनाडच्या जागेवरून प्रियांका गांधी यांना रिंगणात उतरविण्याची तयारी सुरू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.वायनाडच्या जागेवर यापूर्वी स्थानिक नेत्यांला उमेदवारी देण्याची चर्चा सुरू होती. मात्र, ही जागा गांधी परिवाराकडेच ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी २०१९ च्या निवडणुकीत राहुल गांधी यांनी वायनाड आणि अमेठीतून लोकसभा लढविली होती. अमेठीत त्यांचा पराभव झाला, तर वायनाडमध्ये ते जिंकले होते.

# चांदणी चौकात अपघात, चार जण जखमी; पायी जाणाऱ्या महिलेची प्रकृती चिंताजनक

● पुणे, प्रतिनिधी :



शहरातील मार्केट यार्ड परिसरात डंपर चालकाने महिलेला चिरडल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी (दि. १३) चांदणी चौकात सिमेंट मिक्सर ट्रक आणि एसटी महामंडळाच्या मालवाहतूक करणाऱ्या बसचा भीषण अपघात झाला. दोन्ही वाहनांनी एकमेकांना धडक दिल्याने, वाहने दुभाजक तोडून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला आली. यात कार्गो बसच्या धडकेत चार जण गंभीर जखमी झाले आहेत. यामध्ये महिलेची प्रकृती चिंताजनक असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली. हा अपघात गुरुवारी संध्याकाळी साडेचारच्या सुमारास घडला. अपघात ब्रेक निकामी झाल्यामुळे झाला का, यामागील नेमके कारण आरटीओच्या अहवालानंतर समोर येईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. एसटीच्या कार्गो आणि सिमेंट मिक्सर ट्रकच्या अपघातात प्रफुल्ल नागपुरे, प्रसाद साळुंखे यांच्यासह एक जण किरकोळ जखमी, तर पायी जाणाऱ्या कविता साठे या गंभीर जखमी झाल्या आहेत. अधिक माहितीनुसार, एसटी महामंडळाची कार्गो बस हिंजवडीहून कोथरूडच्या दिशेने येत होती, त्याच वेळी चांदणी चौकातून खाली उतरत असताना बसचालकाचे नियंत्रण सुटल्याने बस मिक्सर ट्रकला धडकली. त्यामुळे दोन्ही वाहने दुभाजक तोडून दुसऱ्या लेनवर गेली. एसटीने मिक्सर वाहनाला धडक दिल्यामुळे दुसरीकडे वळण घेतले आणि समोरून जाणाऱ्या दुचाकींना जोरदार धडक दिली. या अपघातात एक दुचाकी एसटीच्या चाकाखाली आली, तर दुसरी दुचाकी दुभाजकावर जाऊन आदळली. अपघातात चार जण गंभीर जखमी झाले आहेत. कविता साठे या पायी जात होत्या. त्यांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांना उपचारांसाठी खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. इतर दोघांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातग्रस्त महिला भूगावमधून निघाली होती. तर, दुसऱ्या दुचाकीवरील तरुण मूळचा गोंदियातील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. बसचालकाचे नियंत्रण सुटल्याने उतारावरून गाडी दुसऱ्याच लेनवर गेली आणि हा भीषण अपघात झाला.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून वर्सोवा सूर्या प्रकल्प दुर्घटनेची पाहणी

● वसई, प्रतिनिधी :



वर्सोवा खाडीजवळ सूर्या प्रकल्पाच्या कामादरम्यान घडलेल्या दुर्घटनेची राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी प्रत्यक्ष घटनास्थळाला भेट देत पाहणी केली. यात अडकून पडलेल्या राकेश कुमार चालकांचा शोध घेण्यासाठी पुन्हा शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे.

२९ मे रोजी रात्री ९.३० वाजता वर्सोवा खाडी पुलाजवळ एल अँड टी कंपनी यांच्या मार्फत सूर्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या बोगद्याचे काम सुरू असताना भूस्खलन होऊन दुर्घटना घडली होती. या दुर्घटनेत मातीच्या ढिगाऱ्याखाली पोकलेनसह चालक राकेश कुमार यादव हा अडकून पडला आहे. याप्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात ठेकेदार यांच्यावर गुन्हा ही दाखल झाला आहे. परंतु १७ दिवस उलटून गेले तरी अजूनही त्याचा शोध लागला नाही.

शुक्रवारी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी दौरा करून संपूर्ण घटनेची माहिती घेतली. यावेळी त्यांनी घडलेली घटना ही अतिशय दुर्दैवी असून त्यात अडकून पडलेल्या चालकाचा शोध घेण्यासाठी एनडीआरएफचे प्रयत्न सुरू होते. आता त्यांच्यासह आर्मी, नेव्ही, कोस्टल गार्ड यासह इतर स्थानिक प्रशासकीय यंत्रणा नेमण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आहे.

शोध कार्यात निष्काळजीपणा

१७ दिवस झाले तरीही अजूनही काँक्रिट भिंत व ढिगाऱ्याखाली अडकलेल्या राकेश कुमार यादव याचा शोध लागला नाही. या शोध कार्यात निष्काळजीपणा दाखविला जात असल्याचा आरोप राकेश यांच्या कुटुंबियांनी केला आहे. मागील चार दिवसांपासून बचाव कार्य थांबविण्यात आले होते. आता मुख्यमंत्री येणार म्हणून पुन्हा शोध कार्य सुरू केले आहे, असे राकेश यांच्या वडिलांनी सांगितले आहे.

# अयोध्येला जाणाऱ्यांची संख्या घटली, स्पाइसजेटनं विमान सेवा बंद केली!




● अयोध्या, प्रतिनिधी :

एअरलाईन कंपनी स्पाईसजेटने हैदराबाद-अयोध्या थेट विमान सेवा बंद केली आहे. प्रवाशांची मागणी घटल्याने स्पाईसजेटने हा निर्णय घेतला आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला ही विमानसेवा सुरू करण्यात आली आहे. हैदराबादवरून अयोध्येला जाण्यासाठी आठवड्यातून तीन वेळा विमानसेवा सुरू करण्यात आली होती.

स्पाइसजेटच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहिती नुसार, अयोध्येला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर घटली आहे. यामुळे मागणी कमी झाल्याने ही सेवा बंद करण्यात आली आहे. गुरुग्राममधील एअरलाइनने आपले अखेरचे उड्डाण 1 जून केले होते.

मागणीनुसार चालवली जातात विमानं -

स्पाइसजेटने हैदराबादहून अयोध्येसाठीची विमान सेवा बंद केली असली, तरी अयोध्या-चेन्नई मार्ग अद्याप सुरू आहे. तसेच, व्यावसायिक व्यवहार्यता आणि प्रवाशांची मागणी लक्षात घेऊन उड्डाणे निर्धारित केली जातात. असेही एअरलाइन्सच्या प्रवक्त्याने म्हटले आहे.

21 जानेवारीला करण्यात आले होते विशेष उड्डाण -


रामलला प्राणप्रतिष्ठा समारंभासाठी स्पाइसजेटने 21 जानेवारीला एक विशेष विमान चालवले होते. ज्याचे उड्डाण दिल्लीहून झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 30 डिसेंबरला अयोध्येत महर्षि वाल्मीकी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन करण्यात आले होते.

यानंतर 31 जानेवारीला, आपण दिल्ली, मुंबई, चेन्नई, अहमदाबाद, जयपूर, बेंगळुरू, पाटणा आणि दरभंगासह आठ शहरांमधून अयोध्येसाठी नवी उड्डाणे सुरू करून आपल्या नेटवर्कचा विस्तार करत आहोत, अशी घोषणा स्पाइसजेटने केली होती.

# दहशतवादाविरोधात पूर्ण ताकदीने मैदानात उतरा

## पंतप्रधानांचे आदेश; जम्मूकाश्मीरमधील सुरक्षेचा आढावा

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :



जम्मू आणि काश्मीरमध्ये गेल्या चार दिवसांत दहशतवादी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी बैठक घेतली. यावेळी राज्यातील सुरक्षेचा आढावा घेतानाच दहशतवाद प्रतिबंधक उपाययोजनांची पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्याचे आदेश यंत्रणांना दिले. या बैठकीला राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

काश्मीरमधील सुरक्षेचा सखोल आढावा घेताना पंतप्रधानांनी पंतप्रधानांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशीदेखील चर्चा केली. बैठकीत सुरक्षा दलांच्या तैनातीबरोबरच दहशतवादविरोधी उपाययोजनांबाबत विचारविनिमय झाल्याचे सूत्रांनी सांगितले. याखेरीज पंतप्रधानांनी जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्याशी संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेतला. सिन्हा यांनी स्थानिक प्रशासनाने सुरक्षेबाबत उचललेल्या पावलांची माहिती दिली. सुरक्षाविषयक परिस्थितीची संपूर्ण माहिती पंतप्रधानांपुढे सादर करण्यात आली.

चार दिवसांत चार हल्ले

गेल्या चार दिवसांत जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी चार हल्ले केले आहेत. रईसी जिल्ह्यात झालेल्या हल्ल्यात बस दरीत कोसळून वैष्णोदेवीला जाणाऱ्या नऊ भाविकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर कथुआ आणि डोडा जिल्ह्यांतही दहशतवादी हल्ले झाले. यात एक जवान शहीद झाला असून नऊ जण जखमी आहेत. कथुआमध्ये चकमकीत दोन संशयित पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आले असून अद्याप या परिसरातील शोधमोहीम सुरू आहे.

## डोभाल तिसऱ्यांदा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार

■ देशातील सर्वात नावाजलेले व अनुभवी हेर अजित डोभाल यांची केंद्र सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी फेरनियुक्ती केली आहे. मंत्रिमंडळाच्या समितीने त्यांच्या नियुक्तीला गुरुवारी मान्यता दिली.

■ सलग तीन वेळा या पदावर विराजमान होणारे ते पहिलेच अधिकारी आहेत. मोदी यांनी पहिल्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर, मे २०१४ मध्ये डोभाल यांच्याकडे हे महत्त्वाचे पद सोपविले होते. त्यानंतर २०१९ आणि आता २०२४ अशी सलग तिसऱ्यांदा त्यांच्याकडे राष्ट्रीय सुरक्षेबाबत मंत्रिमंडळाला सल्ला देण्याची महत्त्वाची जबाबदारी असेल. डोभाल यांना कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा आहे.

■ भारतीय पोलीस सेवेतील १९६८ च्या तुकडीचे अधिकारी असलेले डोभाल हे दहशतवादविरोधी उपाययोजनांमध्ये निष्णात मानले जातात. ईशान्येकडील राज्ये, पंजाब, जम्मू-काश्मीर येथे प्रत्यक्ष कामाचा ३३ वर्षांचा अनुभव डोभाल यांच्या गाठीशी आहे. ते तब्बल सहा वर्षे पाकिस्तानात देशासाठी हेरगिरी करीत असल्याचेही सांगितले जाते.